❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २९६ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



पुढील ४-५ महिन्यांत देशात मोठी उलथापालथ होणार

राज ठाकरे म्हणाले : एक काळ असा येईल, जेव्हा देशाला पंतप्रधानच नसेल

■ मुंबई (दै. संध्या)

देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुढील 4 ते 5 महिन्यांत देशात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. देशात काहीतरी मोठी गडबड होईल, असा अंदाज व्यक्त करतानाच एका टप्प्यावर देशाला पंतप्रधानच नसण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते, असेही ते म्हणाले. सरकारकडून चुका सुरूच राहिल्या, तर देशभरातील लोक रस्त्यावर उतरले तरी आश्चर्य वाटणार नाही, असे भाकीत त्यांनी केले.

मुंबईतील प्रेस क्लबमध्ये छायाचित्रकार दुधलकर यांच्या छायाचित्र प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी राज ठाकरे आले होते. यावेळी पत्रकारांशी झालेल्या संवादात त्यांनी देशातील राजकीय परिस्थिती, लोकशाही, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, ईव्हीएम, तरुणांचा असंतोष आणि दुष्काळाच्या प्रश्नावर आपली भूमिका मांडली. यावेळी त्यांनी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला. तसेच देशात लोकशाही कुठे आहे, असा सवाल उपस्थित करत सरकारच्या कारभारावरही टीका केली. दसरा मेळाव्यांमध्ये झालेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांबाबत विचारले असता, राज ठाकरे यांनी आपण मेळावे पाहिले नसल्याचे सांगितले. राजकीय टीका-टिप्पणी होणारच असून, त्याला चिखलफेक म्हणायचे की आणखी काही, हा वेगळा मुद्दा आहे. मात्र, सध्याच्या परिस्थितीवर बोलले गेलेच पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी दसरा मेळाव्यात एप्रिल महिन्यापर्यंत केंद्र सरकारमध्ये बदल होईल आणि नरेंद्र मोदी यांना पायउतार व्हावे लागेल, असा दावा केल्याबाबत राज ठाकरे यांना विचारण्यात आले. त्यावर उत्तर देताना, पुढील दोन ते चार किंवा पाच महिन्यांत देशात काहीतरी मोठी गडबड होईल, एवढे निश्चित असल्याचे ते म्हणाले.



येत्या काळात अनेक गोष्टी बाहेर येतील आणि सरकारकडून चुका सुरूच राहिल्या, तर ही परिस्थिती थांबणार नाही, असेही त्यांनी सांगितले. देशभरात आंदोलनांची परिस्थिती निर्माण झाली आणि अख्खा देश रस्त्यावर उतरला, तरी आपल्याला आश्चर्य वाटणार नाही, असे राज ठाकरे म्हणाले.

दरम्यान, देशात काही काळ असा येऊ शकतो, जेव्हा देशाला पंतप्रधानच नसेल, असे विधानही त्यांनी केले. मात्र, हा त्यांचा राजकीय अंदाज असून, याबाबत कोणतीही निश्चित घटना किंवा कालमर्यादा सिद्ध झालेली नाही. ईव्हीएमच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित करताना त्यांनी मतदानासाठी मशीनचा वापर कशासाठी केला जातो, असा सवाल केला. मतदाराने एका ठिकाणी बटण दाबल्यानंतर मतदानाची नोंद वेगवेगळ्या यंत्रणांमधून कशी होते, याबाबत त्यांनी आक्षेप नोंदवला. निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा मतदारांना समजणारा आणि विश्वासार्ह असला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. ईव्हीएमच्या समर्थनार्थ मतमोजणी जलद होते, असा युक्तिवाद केला जातो. मात्र, निवडणुकीचे निकाल जाहीर होण्यास प्रत्यक्षात उशीर होत असेल, तर केवळ मतमोजणीच्या वेगाचा मुद्दा पुढे करण्याला काय अर्थ आहे, असा सवाल राज ठाकरे यांनी केला. बॅलेट पेपरवर मतदान आणि मतमोजणीसाठी चार दिवस लागले, तरी त्यात गैर काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. 1995 च्या विधानसभा निवडणुकीचे उदाहरण देताना, त्या वेळी 12 फेब्रुवारीला मतदान झाले आणि 12 मार्चला निकाल जाहीर झाला होता, असे त्यांनी सांगितले. त्यावेळी निकालासाठी एक महिना लागला, तरी त्यामुळे काही फरक पडला नाही, असे त्यांचे म्हणणे होते.

ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घ्या

राज ठाकरे यांनी 2018 पासून निवडणुकांमध्ये बॅलेट पेपरचा वापर करण्याची मागणी करत असल्याचे सांगितले. या मागणीसाठी आपण अनेक राजकीय नेत्यांच्या भेटी घेतल्या होत्या. तसेच तत्कालीन निवडणूक आयुक्तांशी चर्चा करण्यासाठी दिल्लीला गेलो होतो, असेही त्यांनी नमूद केले. त्या वेळी आपण मांडत असलेली भूमिका अनेकांना समजली नव्हती; मात्र आता निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा लोकांना समजू लागला आहे, असे ते म्हणाले. मतदान करताना आपण नेमके कोणाला मत दिले, याचे समाधान मतदाराला मिळाले पाहिजे. बॅलेट पेपरवर मतदान केल्यास आपण निवडलेल्या उमेदवाराच्या नावासमोरील मतपत्रिका मतपेटीत टाकल्याची खात्री मतदाराला मिळते. त्यामुळे मतदान प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वास असणे आवश्यक आहे, असे राज ठाकरे यांनी सांगितले.

थोडक्यात...

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होणार नाहीत : सदावर्ते

मुंबई : दैनिक संध्या

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री बनवण्याचा संकल्प शिवसेनेच्या दसरा मेळाव्यातून काही नेत्यांनी बोलून दाखवला. तर, एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्रीपदाचे दावेदार होते, त्यांच्या नेतृत्वात विधानसभेच्या निवडणुका लढल्या गेल्या, असे रामदास कदम यांनी म्हटले. त्यावरुन, आता मुख्यमंत्रीपदाची चर्चा सुरू झाली असून ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी शिवसेना नेत्यांना डिवचलं. तसेच, टायगर श्रॉफवरील हल्ल्यानंतर टायगर श्रॉफच्या भेटीला गेल्यावरुन एकनाथ शिंदेंनाही लक्ष्य केलंय. एकनाथ शिंदे तुम्ही नजिकच्या काळात मुख्यमंत्री होऊ शकणार नाही. मुख्यमंत्री पद आहे. त्या कार्यकर्त्यांना सांगायचंय ज्यांना वाटतंय शिंदे मुख्यमंत्री होतील, पण असं होणार नाही. लोक तुम्हाला चण्याच्या झाडावर चढवतात, त्यांना माहितीये असं अचानक कोणी मुख्यमंत्री होत नसतं, असे म्हणत गुणरत्न सदावर्ते यांनी शिंदेंच्या शिवसेना नेत्यांना डिवचलं. तसेच, टायगर श्रॉफवरील गोळीबाराच्या घटनेनंतर केलेल्या वक्तव्यावरूनही त्यांनी सुनावलं आहे. एकनाथ शिंदे म्हणतात गोळीला गोळीने उत्तर देणार, पण एकनाथ शिंदेने काय टोळी काढली आहे का, गोळी घालायला? असा सवाल गुणरत्न सदावर्तेंनी उपस्थित केला. संवैधानिक पदावर असणारी व्यक्ती अशी कशी बोलू शकते, कशाची गोळी मारणार? तुम्ही इन्काउंटर करणार? एकनाथ शिंदे तुमच्या जिभेला संविधानाच्या आत ठेवा. तुमचे कानूनी हाल होतील, बिष्णोई गँगचा खात्मा करणार असं तुम्ही बोलू शकत नाही. गँगस्टरसारखं मंत्री महोदयांनी बोलू नये, राज्यपालांनी यांची दाखल घ्यावी, असे म्हणत एकनाथ शिंदेंच्या वक्तव्यावरुन गुणरत्न सदावर्तेंनी त्यांना लक्ष्य केलं.

महाराष्ट्राच्या तीन कलाकारांचा गौरव

नवी दिल्ली : दैनिक संध्या

ललित कला अकादमीच्या ६५ व्या राष्ट्रीय कला प्रदर्शनात महाराष्ट्राच्या तीन कलाकारांनी राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवला आहे. रमेश विठ्ठल थोरात, सिद्धार्थ शाहजीराव शिंगाडे आणि प्रितम मधुकर देवसकर यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रतिष्ठित ललित कला अकादमी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नवी दिल्ली येथील डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात ६५ व्या राष्ट्रीय कला प्रदर्शन आणि तिसऱ्या 'प्रिंट बिनाले इंडिया'च्या संयुक्त पुरस्कार वितरण सोहळ्यास केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत आणि संस्कृती मंत्रालयाचे सचिव विवेक अग्रवाल उपस्थित होते. या सोहळ्यात रमेश विठ्ठल थोरात यांना 'अनटायटल्ड - II' या तैलचित्रासाठी, सिद्धार्थ शाहजीराव शिंगाडे यांना 'ट्रीज' या मिश्र माध्यमातील कलाकृतीसाठी, तर प्रितम मधुकर देवसकर यांना 'ऑफ टाइम ॲण्ड द सिटी' या प्रिंटमेकिंगमधील कलाकृतीसाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बाप दाखवायची भाषा करणाऱ्यांना आज ११ वाजता कळेल : मनोज जरांगे

■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

"दसरा मेळाव्यात एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आमच्यावर ओरडणारे आणि बाप दाखवायची भाषा करणारे नेते आता कितीही थयथयाट करत असले, तरी उद्या सकाळी 11 वाजता पत्रकार परिषद घेऊन भाजपमधील ती सर्व कुजबुज पुराव्यासह महाराष्ट्रासमोर मांडणार आहे. या 500 कोटींच्या संपूर्ण कटात दोन माजी मुख्यमंत्र्यांची नावे असून, त्यात अत्यंत शुद्ध मराठी आणि हिंदी बोलणाऱ्या बड्या नेत्यांचा समावेश आहे. उद्या 11 नंतर खरी औकात कोणाची आहे आणि खरा बेइमान कोण, हे महाराष्ट्रातील जनतेला स्पष्ट दिसेल," असा जोरदार पलटवार मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. बीडच्या नारायणगडावरील दसरा मेळाव्यात मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर भाजप नेत्यांकडून 500 कोटी रुपये घेऊन ते श्रीकांत शिंदे यांच्यामार्फत जरांगेंना दिल्याचा संशय उपस्थित केला होता. यावर रात्री मुंबईतील नेस्को सेंटरमधील दसरा मेळाव्यातून शिवसेना नेते रामदास कदम यांनी जरांगे यांच्यावर "बाथरूममध्ये जाऊन गुपचूप खातात, त्यांची संपत्ती तपासा आणि बाप दाखवा नाहीतर श्राद्ध घाला" असा घणाघाती हल्ला चढवला होता. या टीकेला एका वृत्तवाहिनीशी सविस्तर संवाद साधताना मनोज जरांगे पाटील यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत उत्तर दिले.

रामदास कदम यांच्या विधानाचा समाचार घेताना जरांगे पाटील म्हणाले, "आम्ही लहान असताना रामदास भाई भगव्यासाठी कसे लढायचे हे ऐकत आलो आहोत. त्यामुळे त्यांच्यावर वैयक्तिक चिखलफेक करण्याची माझी इच्छा नाही. मात्र, पक्षाच्या नेत्याची री ओढण्यासाठी ते ज्या पद्धतीने अस्वस्थ आणि बेचैन होऊन बोलले, त्याचे उत्तर देणे भाग आहे. 'बाप दाखवा नाहीतर श्राद्ध घाला' असे ते म्हणाले; मग उद्या सकाळी 11 वाजता हा सूर्य आणि हा जयद्रथ दाखवून देतो." "शिंदे साहेबांनी स्वतः भाजपच्या केंद्रीय आणि राज्यातील नेत्यांना सांगितले नसते, तर भाजपच्या अंतर्गत वर्तुळात ही चर्चा कशी रंगली असती? मी साधा प्रश्न विचारला होता की, 'तुम्ही भाजपला असे सांगितले आहे का, आणि ते पैसे मला दिले आहेत का? दिले असतील तर हो म्हणा, नसतील तर नाही म्हणा.' यावर एवढा त्रागा करण्याचे कारण काय होते? 'पुरावे द्या' असे म्हणत त्यांनीच स्पष्ट केले की पैसे दिले नाहीत." या कथित आर्थिक देवाणघेवाणीच्या मागे फार मोठा राजकीय कट असल्याचा दावा करत त्यांनी गौप्यस्फोट केला. "या संपूर्ण कुजबुजीत दोन माजी मुख्यमंत्र्यांची नावे आहेत.



■ रामदास भाईंबद्दल आदर, पण बाप दाखवतो अन् श्राद्धही घालतो!

सौरव, आशुतोषला ७ दिवसांनंतर जामीन

दिल्ली पोलिसांनी ३ दिवस कोठडी मागितली होती; जंतर-मंतरवर आंदोलनादरम्यान ताब्यात घेतले होते



■ नवी दिल्ली (दै. संध्या)

'कॉकरोच जनता पार्टी' (CJP) चे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना दिल्लीतील एका विशेष न्यायालयाने सात दिवसांच्या कोठडीनंतर जामीन मंजूर केला आहे. १३ ऑक्टोबर रोजी जंतरमंतर येथे सुरू असलेल्या निदर्शनादरम्यान दिल्ली पोलिसांनी या दोघांना ताब्यात घेतले होते. ते तिथे तिरंगा घेऊन पोहोचले होते आणि त्यांच्यासोबत CJP चे ८-१० समर्थकही होते. १२ ऑक्टोबर रोजी सरकारने जंतरमंतरवर निदर्शने करण्यास बंदी घातली होती; तरीही, १३ ऑक्टोबर रोजी हे दोन्ही नेते तिरंगा घेऊन तिथे पोहोचले. त्यानंतर, सार्वजनिक सुव्यवस्थेचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली त्यांना पाच दिवसांसाठी तुरुंगात पाठवण्यात आले होते. १९ ऑक्टोबर रोजी त्यांची कोठडी आणखी दोन दिवसांनी वाढवण्यात आली. तत्पूर्वी, बुधवारी दिल्ली उच्च न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला होता आणि त्यांना सल्ला दिला होता की, उच्च न्यायालयात जाण्यापूर्वी त्यांनी प्रथम दंडाधिकाऱ्यांच्या (मॅजिस्ट्रेट) निर्णयाची प्रतीक्षा करावी. न्यायालयाने असा प्रश्न उपस्थित केला की, जेव्हा मॅजिस्ट्रेटच्या आदेशाला आव्हान देण्यासाठी 'रिव्हिजन पिटिशन' दाखल करण्याचा पर्याय उपलब्ध होता, तेव्हा याचिकाकर्त्यांनी थेट उच्च न्यायालयात कलम २२६ अंतर्गत याचिका का दाखल केली? जेव्हा कायद्यात एखाद्या आदेशाला आव्हान देण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया दिलेली असते, तेव्हा सर्वप्रथम त्या प्रक्रियेचेच पालन केले पाहिजे.

हाय कोर्टाचा प्रश्न: जंतरमंतरवर जाण्यास मनाई होती, तुम्ही का गेलात?

१. हमीपत्राचे (बॉन्डचे) उल्लंघन: दोन्ही व्यक्तींनी (सौरव आणि आशुतोष) यापूर्वी शांतता राखण्याचे हमीपत्र दिले होते. त्यानंतरही ही घटना घडली. हमीपत्राचे उल्लंघन होण्याची भीती खरी ठरली असेल, तर प्रशासनाने कठोर नियमांनुसार कारवाई केली, यात चुकीचे काय आहे?

२. बॅरिकेड्स ओलांडण्याबाबत: आंदोलक बॅरिकेड्स ओलांडतात, तेव्हा त्यांच्यासोबत आणखी १०-२० लोक सामील होण्याचा धोका असतो. बाहेरून आलेले हे लोक आंदोलकांच्या नियंत्रणाबाहेरच्या कृती करू शकतात, ज्यामुळे शांतता भंग पावण्याची शक्यता निर्माण होते.

३. शांततापूर्ण आंदोलनाबाबत: शांततापूर्ण आंदोलन करायचे होते, तर पोलिसांची परवानगी का घेतली नाही? परवानगी घेतली असती, तर आंदोलनाचे वातावरण बिघडवू शकणाऱ्या व्यक्तींना गटात सामील होण्यापासून रोखणे शक्य झाले असते. जर जंतरमंतरवर जाण्यास मनाई होती, तर तुम्ही तिथे गेलातच का?

४. "ते 'जनरेशन-झेड' नाहीत": न्यायालयाने दोन्ही याचिकाकर्त्यांच्या वयाबद्दल विचारणा केली. त्यांच्या वकिलांनी सांगितले की, एकाचे वय २७ वर्षे तर दुसऱ्याचे ३१ वर्षे आहे. त्यावर न्यायालयाने टिप्पणी केली, "ते 'जनरेशन-झेड' (Gen-Z) नाहीत." न्यायालयाने पुढे विचारले की, ते कोण आहेत, काय काम करतात आणि ज्या संघटनेशी ते संबंधित आहेत, तिचा उद्देश काय आहे?

५. नवीन याचिका दाखल करा: सुनावणीत दिल्ली उच्च न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला की, दंडाधिकाऱ्यांच्या (मॅजिस्ट्रेटच्या) आदेशाला आव्हान देण्यासाठी 'रिव्हिजन पिटिशन' (पुनर्विचार याचिका) दाखल करण्याचा पर्याय उपलब्ध होता, तेव्हा कलम २२६ अंतर्गत याचिका का दाखल केली? न्यायालयाने याचिकाकर्त्यांना त्यांच्या सध्याच्या याचिका मागे घेऊन नवीन याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले. थोडक्यात सांगायचे तर, कलम २२६ अंतर्गत सरकारी कृती किंवा आदेशांना आव्हान देण्यासाठी थेट उच्च न्यायालयात दाद मागता येते, तर 'रिव्हिजन पिटिशन'द्वारे कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला कायदेशीर आधारावर आव्हान देता येते.

पुरावे असतील तर यंत्रणांकडे द्या : एकनाथ शिंदे

५००कोटींच्या आरोपांवर जरांगेंना प्रत्युत्तर : दूध का दूध, पानी का पानी होऊ द्या'

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर 500 कोटी रुपयांच्या कथित व्यवहारावरून केलेल्या आरोपांना शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. 'मी 500 कोटी रुपये कोणाला दिलेही नाहीत आणि कोणाकडून घेतलेही नाहीत. आरोप करण्यापूर्वी त्याची शहानिशा करायला हवी होती. जरांगे यांच्याकडे पुरावे असतील, तर त्यांनी ते संबंधित यंत्रणांकडे द्यावेत. या प्रकरणाची चौकशी होऊन दूध का दूध, पानी का पानी झाले पाहिजे,' असे शिंदे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, संजय राऊत यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याबाबत केलेल्या विधानावरूनही शिंदे यांनी विरोधकांना लक्ष्य केले. मोदी आणि शाह यांच्यावर आरोप केले की त्याची ब्रेकिंग न्यूज होते, असा टोला लगावत त्यांनी विरोधकांवर सत्तेविना तडफडत असल्याची टीका केली.मनोज जरांगे पाटील यांनी नारायणगडावरील दसरा मेळाव्यात 500 कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराचा मुद्दा उपस्थित करत एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता. शिंदे यांनी त्यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून आपल्याला 500 कोटी रुपये दिल्याची चर्चा भाजपमध्ये असल्याचा दावा जरांगे यांनी केला होता. यासंदर्भात शिंदे यांनी भाजपच्या नेत्यांना नेमके काय सांगितले, असा सवालही त्यांनी उपस्थित केला होता. या आरोपांवर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे म्हणाले, "कुणाला 500 कोटी रुपये दिलेही नाहीत आणि 500 कोटी रुपये घेतलेही नाहीत. देण्याचा प्रश्नच येत नाही. मनोज जरांगे पाटील ज्या काही आधारावर बोलत असतील, तर त्यांनी आधी त्याची शहानिशा करायला हवी होती. शहानिशा केल्यानंतरच बोलायला पाहिजे होते. त्यांच्याकडे जे काही पुरावे असतील, ते त्यांनी सादर करावेत." जरांगे यांनी पुरावे देण्याबाबत भूमिका मांडल्याचे पत्रकारांनी सांगितल्यानंतर शिंदे यांनी त्यांचे स्वागत केले. संबंधित यंत्रणांकडे पुरावे सादर करून या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. सत्य समोर आले पाहिजे, असे ते म्हणाले. "एकनाथ शिंदे यांना संपूर्ण महाराष्ट्र आणि देश ओळखतो. माझ्या कामाची पद्धत सर्वांना माहीत आहे. अनेक जण एकनाथ शिंदे यांचे नाव घेऊन हेडलाईन करण्याचा प्रयत्न करतात," असा आरोपही त्यांनी केला. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत बोलताना शिंदे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आपल्या सरकारने घेतलेल्या भूमिकेचा उल्लेख केला. जरांगे हे मराठा समाजासाठी काम करत असल्याने आपणही त्यांना मदत केली होती; मात्र त्यांनी समाजाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे, राजकीय व्यासपीठ तयार करू नये, असे आवाहन त्यांनी केले.



'दसरा' मेळाव्यात शिवसेना नेत्याकंडून एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री बनवण्याचा संकल्प

■ मुंबई (दै. संध्या)

दसऱ्याच्या मुहूर्तावर राज्यात जवळपास 5 मेळावे संपन्न झाले. त्यामध्ये मुंबईत दोन्ही शिवसेनेच्या मेळाव्यातून एकमेकांवर टिका टिपण्णी करण्यात आली. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील दसरा मेळाव्यातून शिवसेना नेत्यांनी एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रीपदी विराजमान करण्याचा संकल्प बोलून दाखवला. त्यामध्ये, ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी एकनाथ शिंदे हेच 2024 मध्ये मुख्यमंत्रीपदाचे दावेदार होते, त्यांच्याच नेतृत्वात आपण निवडणुकी जिंकल्याचं म्हटलं होतं. आता, भाजपकडून यावर प्रतिक्रिया देण्यात आली आहे. भाजपा महायुतीने 2024 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात विधानसभेच्या निवडणुका लढल्या होत्या. या निवडणुकीत भाजप महायुती तब्बल 232 जागा जिंकत ऐतिहासिक विजय मिळाला. त्यामुळे, मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे हेच विराजमान होतील असा विश्वास शिवसेना आमदार आणि नेत्यांना होता. मात्र, भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्याने भाजपने नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन करण्यात आले. त्यानंतर, सातत्याने शिवसेना नेत्यांकडून एकनाथ शिंदेना मुख्यमंत्री बनवण्याचा संकल्प किंवा वक्तव्य केले जाते. विशेष म्हणजे दसरा मेळाव्यापूर्वी मंत्री प्रताप सरनाईक यांनीही एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रीपदावर बसवण्याचं वक्तव्य केलं होतं. आता, भाजपाकडून या वक्तव्यावर प्रतिक्रिया आली आहे. भाजपा प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेना नेत्यांच्या वक्तव्यावर भूमिका मांडली. प्रत्येक पक्षातील कार्यकर्त्यांना वाटतं की, मुख्यमंत्री आपला नेता व्हावा. लोकशाहीत आपल्याला मतांची किंमत माहिती आहे, आमदारांचा आकडा जुळत नाही, तोपर्यंत मुख्यमंत्री होऊ शकत नाही, असे म्हणत संख्याबळ हेच मुख्यमंत्री ठरवते असे नवनाथ बन यांनी सांगितले. सध्या भाजपकडे 137 आमदार आहेत, आणि म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस झाले आहेत. प्रत्येक पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी सातत्याने अशी वक्तव्ये केली जातात, असेही बन यांनी म्हटले. दरम्यान यावेळी, बन यांनी ठाकरेंच्या शिवसेना मेळाव्यावर टीकाही केली.



संपादकीय

मताधिकाराचा मुद्दा निर्णायक ठरणार?

कॉक्रोच जनता पक्षाच्या आवाहनावरून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि मोदी सरकारविरोधात पुन्हा तरुणाई दिल्लीच्या रस्त्यावर उतरल्याचे दिसत आहे, "लहरा दो तिरंगा" या आंदोलनाला आम आदमी पक्षासह अनेक संघटनांनी पाठिंबा दिलेला आहे, सीजीपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांना आंदोलनापूर्वीच पोलिसांनी ताब्यात घेतलेले होते,सीजेपी चे नेते सौरभदास आणि आशुतोष रांका यांना अटक करून त्यांची तिहार तुरुंगात रवानगी केल्याच्या निषेधार्थ सीजेपीने तिरंगा फडकवण्याच्या कार्यक्रमाची घोषणा केली होती, यानंतर कॅनॉट प्लेस मध्ये तरुणांनी मोठी गर्दी केलेली होती, सरकारकडूनही सहा हजाराहून अधिक पोलिस आणि सुरक्षा जवान तैनात केलेले होते, त्यानंतरही आंदोलकाच्या गर्दीवर परिणाम झालेला नाही, आणि यावेळी शेकडो आंदोलकांनी शांततापूर्ण आंदोलन केले असल्याचे सांगण्यात येते, कॅनॉट प्लेस हे आंदोलनाचे स्थळ नसल्याने तिथे मोर्चा काढू नये, म्हणून पोलिसांनी दिपके यांना नोटीस बजावलेली होती, त्यानंतर पोलिसांनी दीपके यांनाही अटक केल्याचे सांगण्यात आले,आईसाच्या अध्यक्षा नेहा बोरा यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले, कॅनॉट प्लेस परिसरात संचारबंदीचे कलम लागू असतानाही व मोठ्या संख्येने पोलिस तैनात करूनही "लहरा दो तिरंगा" या आंदोलनासाठी अनेक तरुण-तरुणी स्वयंस्फूर्तीने वेगवेगळ्या समूहामध्ये या ठिकाणी जमल्याचे पहावयास मिळाले, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी आणि कथित १३ कोटी व्होट चोरीच्या विरोधात दिल्लीत तापलेले वातावरण सध्या देशाच्या राजकारणाचा केंद्रबिंदू ठरलेले आहे, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील" इंडिया" आघाडीने हा लढा एकजुटीने लढण्याचा निर्धार व्यक्त केला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, आणि निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना न्यायालयात खेचण्याचा इशारा दिलेला आहे, नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी, तेजस्वी यादव, यांच्यापासून ते युवा नेत्या नेहा बोरा, आणि महुआ सह सर्वच विरोधी पक्षाचे नेते एकत्र दिसले, सर्वोच्च न्यायालयाच्या दिशेने काढलेला महामोर्चा आणि सरकारवर केलेले आरोप पाहता हा संघर्ष अधिकाधिक तीव्र होण्याची शक्यता वाढलेली आहे,मात्र ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यापुरते हे आंदोलन मर्यादित ठेवणे कितपत योग्य ठरू शकेल? कारण निवडणूक आयोगाचे अध्यक्षाचा राजीनामा मागणी दीर्घकाळ केल्यास सामान्य जनतेचे दैनंदिन प्रश्न आणि मूळ मुद्द्यापासून लक्ष विचलित होऊ शकते, त्याऐवजी सर्वसामान्य माणसांचा मताधिकार धोक्यात आलेला आहे, हा अत्यंत संवेदनाशील आणि पायाभूत मुद्दा विरोधकांनी लावून धरला तरच या आंदोलनाला खऱ्या अर्थाने जनसामान्याचा भक्कम पाठिंबा मिळू शकेल, आपला मताधिकार गेला तर सरकारी योजनेचे लाभ बंद होतील, पासपोर्ट किंवा त्याला मुदत वाढ मिळण्यासाठी अडथळा येऊ शकतो, अशी भीती लोकांच्या मनात निर्माण करण्यात जर विरोधक यशस्वी झाले तर कदाचित या आंदोलनाला व्यापक जनाधार मिळून शकेल असे वाटते, नीट परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर युवावर्ग रस्त्यावर उतरला, त्या आंदोलनाला पालकांचाही पाठिंबा होता, कारण आपल्या मुलाने डॉक्टर व्हावे हे स्वप्न पालक पाहातात, त्याकरता लागणारी फी भरतात, क्लासेसचा खर्च करतात, त्यामुळे नीट विरोधातील आंदोलन हे देशभर गाजले, आणि देशभर पसरले,व्होट चोरीचा मुद्दा हा पण जनतेच्या मनाला भिडलेला विषय आहे, परंतु निवडणूक आयुक्त यांच्या राजीनाम्या पुरता हा विषय मर्यादित ठेवला तर विरोधकाच्या पदरी निराशा येण्याची शक्यता वाटते, भारतीय लोकशाहीत निवडणूक आयोगाची स्वायत्तता आणि मतदारांचा अधिकार हा मोठा मानला जातो,जर नागरिकांच्या मताशी खेळ होत असेल तर तो केवळ राजकीय पक्षांच्या नाही तर थेट संविधानाचा आणि लोकशाहीचा अपमान आहे, परंतु या लढ्यासमोर आणि इंडिया आघाडीचे समोर काही वास्तववादी व गंभीर राजकीय आव्हाने उभी आहेत, आगामी उत्तर प्रदेशसह काही राज्याच्या विधानसभा निवडणुका होणार आहेत, या निवडणुकांमध्ये विरोधी पक्षांमध्ये बेबनाव कसा होईल व तो बेबनाव निर्माण करण्याचा सत्ताधारी भारतीय जनता पक्ष कसोशीने प्रयत्न करणार व करत आहे हे वारंवार सिद्ध झालेले आहे विरोधी पक्षामध्ये जागा वाटपाच्या प्रत्येक टप्प्यावर स्थानिक पातळीवर तीव्र स्पर्धा व गटबाजीतून संघर्ष निर्माण होतो, या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षासारख्या बलाढ्य आणि संघटित राजकीय शक्तीचा मुकाबला करण्यासाठी इंडिया आघाडीला केवळ दिल्लीतील आंदोलनापुरते नव्हे तर तळागाळातील राजकारणात मोठी व्यावहारिक परिपक्वता दाखवावी लागेल, विरोधकांना वैयक्तिक केव्हा पक्षीय महत्त्वकांक्षा बाजूला सारून "मताधिकार" हा एकमेव कणा मानून पुढील राजकारण करावे लागेल तरच त्याचा टिकाऊ लागू शकतो.अन्यथा आंदोलनाला जनाधार मिळणे कठीण आहे.

अनोळखी मृतदेहाची ओळख पटवली अन् श्रीरामपूरमधून आरोपीला बेड्या

कोंढापुरीत तरुणाचा निर्घृण खून; शिक्रापूर पोलिसांनी १२ तासांत उलगडले हत्येचे गूढ, दोन अल्पवयीन बालके ताब्यात

■ शिक्रापूर (दै. संध्या)

निर्जन ठिकाणी तरुणाचा निर्घृण खून करून पसार झालेल्या आरोपींचा शिक्रापूर पोलिसांनी अवघ्या १२ तासांत छडा लावला. कोंढापुरी येथील तलावाच्या कडेला रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अनोळखी मृतदेहाची ओळख पटवून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे थेट अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूरपर्यंत आरोपींचा माग काढत एका संशयिताला अटक करण्यात आली. या प्रकरणात दोन अल्पवयीन बालकांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. शिक्रापूर पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईने खुनाचा गंभीर गुन्हा अल्पावधीत उघडकीस आला आहे.

बुधवारी (दि. २१) सकाळी सातच्या सुमारास शिरूर तालुक्यातील कोंढापुरी गावच्या हद्दीत खंडोबा मंदिरासमोरील तलावाच्या कडेला एका अनोळखी



व्यक्तीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची माहिती पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांना मिळाली. त्यांनी तातडीने पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले यांनी सुद्धा घटनास्थळी भेट दिली. मृतदेहाची पाहणी केली असता शरीरावर धारदार शस्त्राने वार केल्याच्या अनेक जखमा दिसून आल्या. पोलिसांनी मृताची ओळख पटविण्यासाठी दोन पथके रवाना केली. तपास पथकांनी मृताची ओळख पटवली असता महेंद्र लव सकट (वय २४, रा. रांजणगाव गणपती, ता.शिरूर,जि.पुणे) असे त्याचे नाव असल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तीन स्वतंत्र पथके तयार केली. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू असताना रांजणगाव परिसरातील तिघांचा या गुन्ह्यात सहभाग असल्याचा संशय पोलिसांना आला. दरम्यान, संशयित अहिल्यानगर जिल्ह्यात पळून गेल्याची माहिती मिळताच पोलीस पथकाने त्या दिशेने धाव घेतली. पोलिसांनी संशयितांचा माग काढत श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर बायपास परिसर गाठला. तेथे तिन्ही संशयित मिळून आले. चौकशीत प्रथमेश नानासाहेब राऊत (रा. फंडवस्ती, रांजणगाव गणपती, ता.शिरूर मूळ रा. ढोकसांगवी, ता.शिरूर) याच्यासह दोन अल्पवयीन बालकांचा या प्रकरणाशी संबंध असल्याचे समोर आले. पोलिसांनी प्रथमेश राऊत याला अटक केली असून दोन्ही अल्पवयीन बालकांना तपासासाठी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, मृत महेंद्र सकट, आरोपी आणि अल्पवयीन बालके एकमेकांच्या परिचयातील होते. कोणासोबत फिरायचे आणि कोणाशी बोलायचे, यावरून मृत तरुण व अल्पवयीन बालकांमध्ये वाद होता. याच वादातून मृताला गांजा पिण्याचे आमिष दाखवून निर्जन ठिकाणी नेण्यात आले. तेथे दोन चाकूंनी त्याच्यावर १८ ते २० वेळा वार करून खून केल्याची माहिती चौकशीतून समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. या खुनामागील नेमके कारण आणि संबंधितांची भूमिका याबाबत पुढील तपास सुरू आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक हनमंतराव गिरी राहुल देशमुख आणि पोलीस हेडकॉन्स्टेबल नितीन सुद्रिक राहुल गडदे करीत आहेत.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक डॉ.शुभम कुमार आणि शिरूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर, जिनेश कोळी, अंकुश कारंडे, पोलीस हवालदार अमोल दांडगे, रोहिदास पारखे, शिवाजी चितारे, विश्वभर वाघमारे, अमोल चव्हाण तसेच पोलीस कॉन्स्टेबल राम जाधव, नारायण वाळके आणि मच्छिंद्र निचीत यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

लातूरला 'व्हॉईस ऑफ मीडियाचे महिला पत्रकारांसाठी राज्य अधिवेशन

■ सुनंदा पवार यांच्या हस्ते होणार उद्घाटन, तर डॉ. आशा देशपांडे यांच्या हस्ते समारोप.

■ राजश्री पाटील, वैशालीताई देशमुख, फराह खान, डॉ. कविता राणे यासह राज्यातील अनेक ज्येष्ठ महिला पत्रकार यांचा सहभाग



■ लातूर (दै. संध्या)

'व्हॉईस ऑफ मीडिया' 'व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम', महाराष्ट्र महिला विंगच्या वतीने राज्यस्तरीय महिला पत्रकार अधिवेशनाचे आयोजन २४ व २५ ऑक्टोबर २०२६ रोजी थोरमोटे लॉन्स, औसा रोड, लातूर येथे करण्यात आले आहे. महिला पत्रकारांचे हक्क, सुरक्षितता, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन आणि व्यावसायिक सक्षमीकरण या विषयांवर या दोन दिवसीय अधिवेशनात विचारमंथन होणार आहे.

७८ देशांमध्ये विस्तारलेल्या आणि ७ लाख ४० हजारांहून अधिक पत्रकारांना जोडणाऱ्या 'व्हॉईस ऑफ मीडिया' 'व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम' या संघटनेच्या महिला विंगच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील महिला पत्रकारांना एकत्र आणून संघटनात्मक बळकटीकरण, प्रश्नांची मांडणी आणि आगामी वर्षासाठी कृती आराखडा निश्चित करण्याचे नियोजन आहे. शनिवार, २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया' 'व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम', चे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के अध्यक्षस्थानी असतील, तर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, उद्योजिका व शिक्षणतज्ज्ञ सुनंदा पवार उद्घाटक म्हणून उपस्थित राहतील. गोदावरी बँक समूहाच्या अध्यक्षा महिला संघटक राजश्री पाटील, वैशालीताई देशमुख आणि प्रसिद्ध टीव्ही अँकर व पत्रकार फराह खान यांची विशेष उपस्थिती असेल. सुनंदा पवार आणि राजश्री पाटील यांची फराह खान प्रगट मुलाखत घेणार आहेत.

रविवार, २५ ऑक्टोबर रोजी समारोप सत्रात प्रा. डॉ. आशा देशपांडे या 'पत्रकारितेतील महिलांचे स्थान आणि अपेक्षित बदल'या विषयावर, तर डॉ. कविता राणे या 'माझी स्वतंत्र पत्रकारिता आणि पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक योगदान' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. लातूरच्या महापौर जयश्रीताई सोनकांबळे, जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई संभाजी पाटील तळेगावकर 'व्हॉईस ऑफ मीडिया' 'व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम'चे प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अधिवेशनात महिला पत्रकारांच्या समस्या, सुरक्षितता, आरोग्य, आर्थिक सुरक्षा, आरोग्य विमा, समान संधी, डिजिटल पत्रकारिता, कृत्रिम बुद्धिमत्ता ए आय, सायबर सुरक्षा आणि तथ्य पडताळणी यांवर चर्चा होईल. तसेच २० महत्त्वपूर्ण ठराव मांडणे, जिल्हानिहाय कामाचा आढावा घेणे, प्रशिक्षण व कल्याणकारी उपक्रमांचे नियोजन करणे आणि मंजूर ठरावांच्या अंमलबजावणीसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याची दिशा निश्चित केली जाणार आहे. "महिला पत्रकारांचा सन्मान, सुरक्षितता आणि आर्थिक स्वावलंबन हे केवळ चर्चेचे विषय न राहता त्यासाठी ठोस कृती होणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील महिला पत्रकारांना एकत्र आणून त्यांच्या प्रश्नांना प्रभावी व्यासपीठ देणे, संघटनात्मक एकजूट मजबूत करणे आणि वर्षभरासाठी कृतीशील कार्यक्रम निश्चित करणे, हा या अधिवेशनाचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील निमंत्रित महिला पत्रकारांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या सक्षमीकरणाच्या चळवळीला बळ द्यावे," असे आवाहन 'व्हॉईस ऑफ मीडिया' 'व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम'च्या महिला विंगच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष,प्रमुख वैशाली पाटील यांनी केले. अधिवेशनाच्या आयोजनात राष्ट्रीय महिला संघटक रश्मी मारवाडी, विभागीय प्रदेशाध्यक्ष रोशनी बैस व सोनल महाडिक यांच्यासह महिला विंगचे राज्यस्तरीय पदाधिकारी, विभागीय अध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष सहभागी आहेत. महिला पत्रकारितेला अधिक सक्षम, सुरक्षित आणि प्रभावी बनवण्यासाठी हे अधिवेशन महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजक वैशाली पाटील यांनी सांगितले.

दिवेआगर दुर्घटनेप्रकरणी शिक्षकासह पाच जणांवर गुन्हा

■ आळंदी (दै. संध्या)

दिवेआगर समुद्रकिनारी झालेल्या दुर्घटनेत आळंदी येथील विनर्स अकॅडमीच्या आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याप्रकरणी अकॅडमीच्या संस्थापक शिक्षकासह पाच जणांविरुद्ध दिघी सागरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहलीचे योग्य नियोजन न करणे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पुरेशा उपाययोजना न करणे आणि त्यांना समुद्रात पोहण्यासाठी पाठविणे, असे आरोप तक्रारीत करण्यात आले आहेत. मृत विद्यार्थी राजवीर वहीले याचे वडील युवराज वहीले यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १८ ऑक्टोबर रोजी गुन्ह्याची नोंद करण्यात आली. विनर्स अकॅडमीचे संस्थापक शिक्षक अमर आदक, मृणाल नारखेडे आणि अन्य कर्मचाऱ्यांनी अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी रायगड किल्ला आणि श्रीवर्धन परिसरातील समुद्रकिनाऱ्यावर सहलीचे नियोजन केले होते.

अस्मानी संकटांवर मात करत अक्षय शेलारचे एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश

■ मुर्टी (दै. संध्या)

■ राज्यात १४ वा क्रमांक



बारामती तालुक्यातील जिरायत भाग म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या मुर्टी गावातील सामान्य कुटुंबातील अक्षय निर्मला बाळासो शेलार याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत बिलीफ क्लार्क परिक्षेत यश मिळवले.अक्षय हा जिद्द चिकाटी व मेहनती मुलगा असून तो सध्या पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा-मोरगाव येथे लिपिक या पदावर काम करत आहे.चार वर्षांपुर्वी अक्षय पी.एस.आय परिक्षेला जात असताना त्याच्या वडीलांचे निधन झाले होते.या दुखातून सावरत असताना व संपुर्ण कुटुंबाची जबाबदारी खांद्यावर पडल्याने त्याचे काही मार्क्सने पी.एस.आय पद हुकले.वडीलांना वर्ष होऊन गेल्यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी ही अक्षयच्या आयुष्यात संकटे येत होती परंतू या संकटांना त्याने निधड्या छातीने तोंड देत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या बिलीफ क्लार्क या पदाला गवसणी घालत परिक्षेत घवघवीत यश मिळवले.या यशामुळे अक्षयचे संपुर्ण कुटुंब,पाहुणे,मित्र मंडळ व मुर्टी ग्रामस्थांकडून अभिनंदन होत आहे.मुर्टी गावात अनेक जण महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परिक्षा देऊन यश मिळवणारे असले तरी चिरेखाणवाडीतील पहीलाच व्यक्ती अक्षय शेलार असल्याने वाडीतील नागरिकांनी अभिमान व्यक्त करत भविष्यात अक्षय सारखे बनन्याचा सल्ला शालेय विद्यार्थ्यांना दिला आहे.

'गाता रहे मेरा दिल' संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन


■ डॉ. राजेंद्र काळे यांच्या सुमधुर स्वरांतून रंगणार मुकेश यांच्या अजरामर गीतांचा सुरेल नजराणा

■ जनजागृती संस्था मीडिया पार्टनर

■ डोंबिवली (दै. संध्या)

जुन्या हिंदी चित्रपटगीतांचा सुवर्णकाळ पुन्हा अनुभवण्याची संधी संगीतप्रेमींना मिळणार आहे. म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंट प्रस्तुत 'गाता रहे मेरा दिल' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत डोंबिवली पूर्व येथील तिलक नगरमधील सर्वेश हॉल येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक डॉ. राजेंद्र काळे हे ज्येष्ठ पार्श्वगायक मुकेश यांच्या अजरामर गीतांचा सुरेल नजराणा सादर करणार आहेत.

जुन्या हिंदी चित्रपटसृष्टीतील भावपूर्ण गीते, मनाला भिडणाऱ्या चाली आणि अविस्मरणीय संगीताचा अनुभव रसिकांना देणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. मुकेश यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गायकीने अनेक पिढ्यांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. त्यांच्या गीतांमधील भावनिकता, प्रेम, विरह आणि जीवनाचे तत्त्वज्ञान



आजही रसिकांना भावते. अशा अजरामर गीतांची मैफल अनुभवण्याची संधी या कार्यक्रमाच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.या ऑर्केस्ट्रा मध्ये इतरही गायक-गायिका आपली सुमधुर गाणी सादर करणार आहेत. या कार्यक्रमात डॉ. राजेंद्र काळे हे 'व्हॉइस ऑफ मुकेश' म्हणून मुकेश यांच्या लोकप्रिय गीतांचे सादरीकरण करणार आहेत. त्यांच्या गायनातून जुन्या हिंदी गीतांची गोडी आणि संगीताचा सुवर्णकाळ पुन्हा अनुभवता येणार आहे. 'अ मेलोडियस म्युझिकल इव्हनिंग' अर्थात सुरेल संगीताची संध्याकाळ, अशी या कार्यक्रमाची संकल्पना आहे. म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंटच्या वतीने शर्मिला केसरकर या कार्यक्रमाच्या आयोजक असून त्या गायिकाही आहेत. कार्यक्रमाच्या सोशल मीडिया व्यवस्थापनाची जबाबदारी तनया केसरकर यांच्याकडे आहे. संगीत संयोजन तुषार बने करणार असून आकाश ऑडिओ साउंड यांच्याकडून ध्वनिव्यवस्था सांभाळली जाणार आहे.

या कार्यक्रमासाठी जनजागृती सेवा संस्था ही मीडिया पार्टनर म्हणून सहभागी झाली आहे. संगीताचा आनंद अधिकाधिक रसिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी संस्थेचे सहकार्य लाभणार आहे. संस्थेच्या सहभागामुळे कार्यक्रमाच्या प्रसिद्धीला आणि जनसंपर्काला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत डोंबिवली पूर्व, तिलक नगर येथील सर्वेश हॉलच्या दुसऱ्या मजल्यावर हा कार्यक्रम होणार आहे. संगीतप्रेमींनी या सुरेल मैफलीचा आनंद घेण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक शर्मिला केसरकर यांनी केले आहे.

कार्यक्रमाचा तपशील

कार्यक्रम: गाता रहे मेरा दिल – संगीतमय संध्या
आयोजक: म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंट
प्रमुख गायक: डॉ. राजेंद्र काळे (व्हॉइस ऑफ मुकेश)
आयोजक व गायिका: शर्मिला केसरकर
सोशल मीडिया एक्झिक्युटिव्ह: तनया केसरकर
मीडिया पार्टनर: जनजागृती सेवा संस्था
संगीत संयोजक: तुषार बने
ध्वनिव्यवस्था: आकाश ऑडिओ साउंड
दिनांक: शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६
वेळ: सायंकाळी ५ ते रात्री ९
स्थळ: सर्वेश हॉल, दुसरा मजला, तिलक नगर, डोंबिवली पूर्व, महाराष्ट्र
संपर्क: शर्मिला केसरकर – ९३२१७ ४४१६७या नव्या जुन्या गाण्यांचा श्रवणीय आनंद घेण्यासाठी रसिक प्रेक्षकांनी या संगितमय कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे असे आवाहन म्युझिक मंत्राच्या ऑर्गनायझर आणि गायिका शर्मिला केसरकर यांनी केले आहे.

मोबाईलच्या अतिवापराबाबत जनजागृतीपर कार्यक्रम संपन्न

■ सासवड (दै. संध्या)

शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवड येथे इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी पूर्व-प्राथमिक विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी मोबाईलच्या अतिवापराबाबत जनजागृतीपर कार्यक्रम सादर केला. आजच्या डिजिटल युगात मोबाईलचा वाढता वापर ही चिंतेची बाब बनली आहे. लहान वयात मोबाईलचा अतिवापर झाल्यामुळे मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासावर विपरीत परिणाम होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी मोबाईलचा मर्यादित वापर करण्याचे महत्त्व सोप्या, मनोरंजक आणि प्रभावी पद्धतीने समजावून सांगितले.

या जनजागृतीपर कार्यक्रमात इयत्ता आठवीतील पुढील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला :१. कुमार अभिचंद्र अवधूत खैरे २. कुमारी स्वर्णिका प्रवीण खैरनार ३. कुमारी उपासना सुनील क्षीरसागर ४. कुमारी आर्या शेखर मोरे ५. कुमारी शरयू सचिन गिरमे ६. कुमारी सुदीक्षा सतीश गायकवाड ७. कुमार प्रत्युष प्रशांतकुमार भावसार या कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य श्री. अभिजीत टकले सर,उपप्राचार्या सौ.सुषमा रासकर मॅडम,ज्युनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख सौ. उज्ज्वला जगताप मॅडम आणि पूर्व-



प्राथमिक विभागाच्या विभाग प्रमुख सौ. सुनीता जगताप मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळेच्या शैक्षणिक समन्वयक श्रीमती . रेणुका सिंग मर्चंट मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच सौ. सुनीता जगताप मॅडम, सौ. मनीषा पाटील मॅडम, सौ. पूनम जाधव मॅडम आणि सौ. कल्पना जगताप मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना मोबाईलवर अधिक वेळ घालवण्याऐवजी मैदानी खेळ खेळणे, गोष्टींची पुस्तके वाचणे, चित्रकला करणे, मित्रांसोबत खेळणे आणि कुटुंबीयांसोबत वेळ घालवणे यांसारख्या चांगल्या सवयींचे महत्त्व पटवून देण्यात आले. 'मोबाईलचा वापर मर्यादित ठेवा, खेळा, वाचा आणि आनंदी राहा!' हा महत्त्वपूर्ण संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी लहान मुलांमध्ये मोबाईलच्या अतिवापराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी केलेला हा उपक्रम कौतुकास्पद ठरला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संवादकौशल्य आणि जबाबदारीची भावना विकसित होण्यास मदत होते. शाळेचे जनसंपर्क अधिकारी श्री अमोल सावंत सर यांनी विद्यार्थ्यांचे सुंदर फोटो व व्हिडिओ काढून कार्यक्रमाची आठवण चिरंतन ठेवण्यास मदत केली.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



गरजू नागरिकांसाठी भवानी पेठेत 'आदर्श सेवा ओपीडी' सुरू

■ जनरल व नेत्रतपासणीसह मोतीबिंदू तपासणीची सुविधा उपलब्ध

पुणे : दैनिक संध्या

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने श्री आदर्श मंडळ यांच्या वतीने, महा एनएमओ, महाराष्ट्र यांच्या सहकार्याने आणि जयतु सोशल फाउंडेशनच्या सौजन्याने 'आदर्श सेवा ओपीडी' सुरू करण्यात आली. या केंद्रात जनरल ओपीडी, नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू तपासणीची सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध करून देण्यात येणार असून, भवानी पेठ परिसरातील गरजू नागरिकांना त्याचा लाभ घेता येणार आहे. या आरोग्यसेवा केंद्राचे उद्घाटन पुणे असोसिएशनचे अध्यक्ष फतेचंद रांका यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी श्री आदर्श मंडळाचे अध्यक्ष सुभाष ओसवाल, जयतु सोशल फाउंडेशनच्या संस्थापक कल्याणी पूजा सुकेश रणसिंग, समन्वयक गणेश मोरे, गौरी तारू, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाह राहुल पुंडे, महा एनएमओचे डॉ. प्रशांत चौधरी, डॉ. आशुतोष जपे, डॉ. फाल्गुनी जपे आणि डॉ. उमरजी यांच्यासह विविध मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते. आर्थिक अडचणींमुळे अनेक नागरिकांना वेळेवर आरोग्य तपासणी करून घेता येत नाही. विशेषतः झोपडपट्टी परिसरातील नागरिकांना प्राथमिक आरोग्यसेवा मिळवताना अडचणी येतात. ही बाब लक्षात घेऊन सुरू करण्यात आलेल्या या केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना प्राथमिक आरोग्य तपासणी, नेत्रविषयक समस्यांची तपासणी आणि आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन मिळणार आहे. गरजेनुसार पुढील उपचारांसाठीही मार्गदर्शन केले जाणार आहे. श्री आदर्श मंडळ, महा एनएमओ, महाराष्ट्र आणि जयतु सोशल फाउंडेशन यांच्या सहकार्याने सुरू झालेल्या या उपक्रमाद्वारे अधिकाधिक गरजू नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे आणि वेळेवर तपासणीचे महत्त्व पटवून देणे, हेदेखील या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. आदर्श सेवा ओपीडी हे आरोग्यसेवा केंद्र ऑफिस नं. ए-१०३, कल्पतरू प्लाझा, रामोशी गेट, भवानी पेठ येथे सुरू करण्यात आले आहे. गरजू नागरिकांनी या केंद्रातील आरोग्यसेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

श्री महालक्ष्मी मंदिरातर्फे आयोजित आरोग्य शिबीरात ३५० महिलांची तपासणी



■ नवरात्रोत्सवानिमित्त महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

■ श्री महालक्ष्मी मंदिर व हरजीवन हॉस्पिटल यांच्या तर्फे आयोजन

पुणे : दैनिक संध्या

रक्तदाब, श्वसन दर, शरीराचे तापमान, नाडी, रक्तातील ऑक्सिजनची पातळी आणि रक्तशर्करा यांसारख्या तपासण्या नवरात्रोत्सवानिमित्त महिलांसाठी आयोजित मोफत आरोग्य शिबिरात करण्यात आल्या तब्बल ३५० महिलांच्या विविध तपासणी करण्यात आल्या. सारसबागेसमोरील हरजीवन हॉस्पिटल येथे हे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग व हरजीवन हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हे शिबीर मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ पर्यंत सुरु राहणार आहे. शिबिराचे संयोजन डॉ. सागर रोकडे पाटील यांसह मंदिर ट्रस्टचे प्रमुख संस्थापक आणि विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त व उत्सव प्रमुख डॉ.तृप्ती अग्रवाल, विश्वस्त भरत अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल म्हणाल्या, नवरात्रोत्सवात स्त्री शक्तीचा जागर करण्यासोबतच आरोग्याचा जागर देखील व्हावा, याकरिता शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कुटुंबातील महिला आरोग्य दृष्टया सक्षम आणि साक्षर असेल, तर संपूर्ण कुटुंब निरोगी राहू शकते. आजच्या धकाधकीच्या काळात महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले. शिबीरात संपूर्ण सीबीसी, थायरॉईड कार्यक्षमता, लिपिड प्रोफाइल, कॅल्शियम, युरिक ॲसिड आणि जीवनसत्त्व बी१२ या रक्ततपासण्यांची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय महिलांसाठी मॅमोग्राफी, हाडांच्या घनतेची तपासणी देखील करण्यात आली. तसेच मंदिरातर्फे आयोजित रक्तदान शिबिरात ५० हून अधिक जणांनी रक्तदान करीत सहभाग घेतला. आरोग्य शिबीराच्या नोंदणी व अधिक माहितीसाठी ७५१७५६९९२९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

मानवी मूल्ये जपण्याची जबाबदारी मानव संसाधन व्यवस्थापकांची : प्रदीप भार्गव



पुणे : दैनिक संध्या

महिलांसोबत विविध क्षेत्रांत काम करताना त्यांच्या बुद्धिमत्तेचा, दूरदृष्टीचा आणि नियोजन कौशल्याचा अनुभव आला आहे. महिला प्रत्येक क्षेत्रात सक्षम असून, नियोजन आणि अंमलबजावणीतही त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. उद्योग क्षेत्रातील संबंध केवळ व्यावसायिक व्यवहारांपुरते मर्यादित न राहता त्यात मानवी नातेसंबंध आणि संवेदनशीलता जपली पाहिजे. मानवी मूल्ये जपण्याची जबाबदारी मानव संसाधन व्यवस्थापकांची आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ उद्योजक प्रदीप भार्गव यांनी केले. श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग येथे विविध क्षेत्रांतील ५० महिला मानव संसाधन व्यवस्थापिकांचा प्रदीप भार्गव यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल, विश्वस्त भरत अग्रवाल, प्रविण चोरबेले उपस्थित होते. ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त राजकुमार अग्रवाल आणि अमिता अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. प्रदीप भार्गव म्हणाले, आयुष्यात विविध महिलांसोबत काम करताना त्यांच्याकडून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. आजच्या काळात अनेक गोष्टी व्यवहारकेंद्रित झाल्या आहेत. अशा परिस्थितीत मानव संसाधन व्यवस्थापकांची जबाबदारी अधिक महत्त्वाची ठरते. संस्थेतील मानवी मूल्यांचे जतन करणे आणि कर्मचाऱ्यांमध्ये माणुसकी व संवेदनशीलता टिकवून ठेवणे हे मानव संसाधन विभागाचे महत्त्वाचे काम आहे. कंपन्या सामाजिक उत्तरदायित्वांतर्गत विविध उपक्रम राबवतात; मात्र स्वतःच्या कर्मचाऱ्यांप्रतीही तितकीच संवेदनशीलता दाखवून त्यांच्या गरजांचा विचार केला पाहिजे. प्रत्येकाशी न्याय्य वागणे आणि संस्थेत मानवी संबंधांना महत्त्व देणे आवश्यक आहे.

'आपण लता युगात जन्मलो हे आपले भाग्य' : आबा बागुल

'लता युगा' मधील सुमधुर गाण्यांमध्ये रसिक प्रेक्षक नाहून निघाले!

■ पुणे (दै. संध्या)




३२ व्या पुणे नवरात्रौ महोत्सवात ९ व्या दिवशी 'लता युग' या कार्यक्रमांमधील भारतरत्न स्वरस्वामिनी लता मंगेशकर यांनी गायलेल्या गीते ऐकताना रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन गेले. श्री गणेश कला क्रीडा रंगमंदिर येथे सायंकाळी निर्माता,दिग्दर्शक आणि निवेदक संदीप पंचवाटकर यांनी सादर केलेल्या 'लता युग' या कार्यक्रमास रसिक प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती. लता मंगेशकरांनी विविध संगीतकारांकडे असंख्य गाणी गायली ती अजरामर झाली.

त्यातील संगीतकार शंकर जयकिशन, लक्ष्मिकांत प्यारेलाल, आर.डी.बर्मन, जतीन ललित, वसंतदेव, रोशन,पं.हृदयनाथ मंगेशकर अशा असंख संगीतकारांनी स्वरबद्ध केलेल्या रचना आपल्या दैवी आवाजाने अजरामर करणाऱ्या लता दीदींच्या सादर झालेल्या प्रत्येक गीताला वन्स मोर मिळत राहिला. गुलजार, हसरत जयपुरी, शैलेंद्र, आनंद बक्षी, इंदीवर, प्रदीप, सुरेशभट, राजा महेंदी, असद भोपाली अशा गीतकारांच्या या रचना मंत्रमुग्ध करत गेल्या. नाम गुम जायेगा, आजा आई बहार, सोला बरस की, मेघा रे मेघा, रात का समा, फुल तुम्हे भेजा है, तुझसे नाराज नही, तुझे देखा तो ये जाना, बाहो मे चले आओ, मेहंदीच्या पानावर, परबत के उस पार, लग जा गले, छोटीसी उमर मे, सलामे इश्क, दिल दिवाना बिन सजना के, मन क्यू बहका, इस मोड से जाते, होटो पे ऐसी बात अशा असंख्य गाण्यांना टाळ्यांच्या कडकडात प्रेक्षकांनी मोठा प्रतिसाद दिला.काही गाण्यांना वन्स मोर ही मिळाला. 'सलामे इश्क' या गाण्यातील दोन कडवी आबा बागुल यांनी स्वतः पेश केली आणि वन्स मोर ही मिळवला. प्रत्येक गाण्यांबद्दल अभ्यासपूर्ण विवेचन करणाऱ्या संदीप पंचावटकर यांच्या रसाळ निवेदनाने प्रेक्षक तृप्त होत होते. कार्यक्रमच्या अखेरीस लता दिदीनी अजरामर केलेले कवी प्रदीप यांचे 'ए मेरे वतन के लोगो सादर झाले. तेव्हा सारे प्रेक्षक आदराने उभे राहिले होते. या शेवटच्या गीताने साऱ्यांचेच मन हेलावून गेले होते. प्रारंभी पुणे नवरात्रौ महोत्सवाचे आयोजक अध्यक्ष आबा बागुल, पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाच्या अध्यक्षा जयश्री बागुल, अपर पोलीस आयुक्त संजय पाटील व सौ प्रतिभा पाटील व उयोगपती चांडक यांच्या हस्ते कलावंतांचे सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमात गायिका रेशमी मुखर्जी, भाग्यश्री डुंभरे, अनुश्री घोरपडे, सहगायक गफार मोमीन, तबला - गोविंद कुडाळकर, ढोलक - नागेश भोसेकर, ऑक्टोप्याड - संजय खाडे, कीबोर्ड - संतोष खंडागळे, संगीत संयोजन कीबोर्ड - सईद खान. या सर्वांचे प्रेक्षकांनी मोठे कौतुक केले. 'आपण सारे 'लता युगा' त जनमलो हे आपल्या भाग्य आहे अशा शब्दात आबा बागुल यांनी कार्यक्रमाचा समारोप केला. या प्रसंगी घनश्याम सावंत यांनी आभार प्रदर्शन केले. या प्रसंगी नंदकुमार बानगुडे, रमेश भंडारी, नंदकुमार कोंढाळकर, अमित बागुल, हेमंत बागुल, सागर आरोळे इत्यादी उपस्थित होते.

हळवे क्षण उलगडणारी 'हिमालया बेबीकेअर'ची नवी जाहिरात

■ पुणे (दै. संध्या)



नवजात बाळाची पहिली आंघोळ हा प्रत्येक पालकाच्या आयुष्यातील एक हळवा, भावनिक आणि अविस्मरणीय क्षण असतो. बाळाच्या नाजूक त्वचेची काळजी घेताना पालकांच्या मनात निर्माण होणारी चिंता आणि त्यातून विश्वासार्ह उत्पादनाची निवड करण्याची धडपड यांचे सुंदर चित्रण 'हिमालया बेबीकेअर'च्या नव्या 'जेंटल बेबी वॉश'च्या जाहिरातीत करण्यात आले आहे. बाळाच्या जन्माच्या पहिल्या दिवसापासून सौम्य आणि विश्वासार्ह काळजी देण्याचा संदेश या जाहिरातीद्वारे देण्यात आला आहे. आई आपल्या नवजात बाळाला घरी घेऊन जाण्याच्या तयारीत असताना, बाळाच्या पहिल्या आंघोळीसाठी कोणते उत्पादन निवडावे, हा प्रश्न तिच्या मनात निर्माण होतो. आई आणि परिचारिका यांच्यातील हृदयस्पर्शी संवादातून नव्या पालकांच्या मनातील काळजी, प्रेम आणि बाळाच्या सुरक्षिततेविषयीची संवेदनशीलता प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. परिचारिका आईच्या चिंतेची दखल घेत तिला आश्वस्त करते आणि 'हिमालया जेंटल बेबी वॉश' या उत्पादनाची शिफारस करते. या जाहिरातीमध्ये उत्पादनाची वैशिष्ट्येही सहज आणि प्रभावीपणे मांडण्यात आली आहेत. कंपनीच्या माहितीनुसार, या उत्पादनात साबणमुक्त, डोळ्यांना जळजळ न करणारा सौम्य फॉर्म्युला असून, त्वचेचा नैसर्गिक संरक्षणात्मक थर जपण्यास मदत करणारा सामू ५.५ आहे. तसेच हिरवे मूग आणि हरभरा यांसारख्या नैसर्गिक घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

हे घटक बाळाच्या नाजूक त्वचेची सौम्य स्वच्छता करण्यास आणि त्वचा मऊ व ओलसर ठेवण्यास मदत करतात, असा कंपनीचा दावा आहे.

या जाहिरातीविषयी बोलताना 'हिमालया वेलनेस कंपनी'च्या बेबीकेअर विभागाचे संचालक चक्रवर्ती एन. व्ही. म्हणाले की, बाळाच्या आयुष्यातील सुरुवातीचे क्षण पालकांसाठी आनंददायी असण्याबरोबरच भावनिकदृष्ट्याही महत्त्वाचे असतात. या काळात आनंदासोबतच अनेक प्रश्न आणि चिंता मनात असतात. अशा वेळी विश्वासार्ह साथीदार म्हणून पालकांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका कंपनीला अधोरेखित करायची आहे.

थरारक शोधावर आधारित 'मिरांडा वॉर्निंग'चा टीजर लाँच




■ पुणे (दै. संध्या)

फार्महाऊसवर झालेल्या खुनाच्या थरारक शोधाची गोष्ट "मिरांडा वॉर्निंग" या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहे. तगडी स्टारकास्ट असलेला हा चित्रपट २७ नोव्हेंबरला सर्वत्र प्रदर्शित होत असून नुकताच या चित्रपटाचा रंजक टीजर सोशल मीडियावर लाँच झाल्यामुळे चित्रपटाविषयी आता कमालीची उत्कंठा निर्माण झाली आहे. सतनाम फिल्म्स स्टुडिओ आणि ओपन गेट मुव्हीज मार्फत "मिरांडा वॉर्निंग" या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. सचिन धोत्रे यांनी चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे तर अल्ट्रा मीडिया एंटरटेनमेंटच्या सुशीलकुमार अग्रवाल आणि सुकल्प चित्रच्या कल्पक जोशी यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. सचिन धोत्रे यांनी चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे. त्यांनी या पूर्वी २०२३ मध्ये 'गेट-टुगेदर' या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं होतं. त्यानंतर 'मिरांडा वॉर्निंग' या चित्रपटातून त्यांनी वेगळा प्रयोग केला आहे. रवींद्र मठाधिकारी, सायली मठाधिकारी यांनी चित्रपटाचं लेखन केलं आहे. या चित्रपाटात अभिनेता आदिनाथ कोठारे, जान्हवी किल्लेकर, सुरेश विश्वकर्मा, पायल जाधव, वैभव चव्हाण, इरिना रुडाकोवा, एकनाथ गीते, त्रिशा कमलाकर अशी दमदार स्टारकास्ट या चित्रपटातून आपल्या भेटीस येणार आहे. फार्महाऊसवर एका खूनाची घटना उघडकीस येते आणि त्यानंतर एक थरारक शोध सुरू होतो, या शोधात काय काय घडतं याची रंजक गोष्ट "मिरांडा वॉर्निंग" या चित्रपटात पहायला मिळणार आहे. या चित्रपटात आदिनाथ कोठारे एका पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत आहे. मराठी चित्रपटसृष्टीत सस्पेन्स, थ्रिलर प्रकारातील चित्रपट यापूर्वी झाले आहेत. मात्र, आता "मिरांडा वॉर्निंग" या चित्रपटातून खून प्रकरणातील गुन्हेगार शोधाची थरारक गोष्ट पाहायला मिळणार आहे. उत्कृष्ट कथानक, कसलेले कलाकार असलेली तांत्रिकदृष्ट्या सक्षम कलाकृती पहायला मिळणार आहे.

एका खून प्रकरणातून उलगडत जाणारे नवनवे पदर, त्यातून निर्माण होणाऱ्या शंका-कुशंका आणि प्रश्न, प्रश्नांची उत्तर शोधण्यासाठीचे तर्क यातून पोलिस अधिकारी खऱ्या गुन्हेगारापर्यंत कसे पोहोचतात याची रंजक कहाणी "मिरांडा वॉर्निंग" चित्रपटातून पाहता येणार असल्याचं टीजरवरून दिसून येतं. त्यामुळे "मिरांडा वॉर्निंग" चित्रपटाविषयीची सर्व उत्तरं मिळवण्यासाठी २७ नोव्हेंबरपर्यंत वाट पहावी लागणार आहे.

स्मार्ट सिटीसाठी अखंडित वीजपुरवठा, स्मार्ट पार्किंग गरजेचे – नरेंद्र गोयल

■ पुणे (दै. संध्या)



झपाट्याने वाढणारे शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि आधुनिक जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर स्मार्ट सिटीच्या उभारणीसाठी अखंडित वीजपुरवठा, अत्याधुनिक पायाभूत सुविधा आणि स्मार्ट पार्किंग व्यवस्था अत्यावश्यक बनली आहे. शहरांचा विकास केवळ रस्ते आणि इमारतींपुरता मर्यादित न राहता, नागरिकांना अधिक सुरक्षित, सुलभ आणि कार्यक्षम सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या तंत्रज्ञानाधारित व्यवस्थांवरही भर देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन श्याम ग्लोबल टेक्नोव्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि इंटेलिपार्किंग सिस्टिम्सचे संचालक नरेंद्र गोयल यांनी केले. पुणे अग्रवाल समाजाच्या वतीने डेक्कन कॉलेज मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या 'प्रवाह बिझनेस एक्स्पो'च्या निमित्ताने ते बोलत होते. या प्रदर्शनात महिंद्रा पॉवरॉल जनरेटर आणि इंटेलिपार्किंग सिस्टिम्सच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या आधुनिक सुविधा व तंत्रज्ञानाचे सादरीकरण करण्यात आले. या तंत्रज्ञानाला उद्योजक आणि व्यावसायिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. नरेंद्र गोयल म्हणाले की, आजच्या काळात रुग्णालये, हॉटेल्स, शॉपिंग मॉल्स, औद्योगिक आस्थापना, व्यावसायिक संकुले आणि निवासी प्रकल्पांसाठी अखंडित वीजपुरवठा अत्यंत महत्त्वाचा आहे. वीजपुरवठ्यातील व्यत्ययामुळे कामकाजावर परिणाम होऊ नये, यासाठी विश्वासार्ह जनरेटर व्यवस्था आवश्यक ठरते. या दृष्टीने महिंद्रा पॉवरॉल जनरेटर विविध क्षेत्रांसाठी उपयुक्त पर्याय ठरतात. त्याचप्रमाणे, वाढत्या वाहनसंख्येमुळे शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या पार्किंगच्या समस्येवर उपाय म्हणून इंटेलिपार्किंग सिस्टिम्सचे आधुनिक पार्किंग तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण ठरू शकते. मर्यादित जागेचा अधिक कार्यक्षम वापर करून पार्किंग व्यवस्थापन सुलभ करणे, वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत करणे आणि शहरी पायाभूत सुविधांचा योग्य वापर करणे ही काळाची गरज आहे. स्मार्ट सिटीच्या विकासात अशा आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वपूर्ण राहणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महावितरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई निविदा सुचना

केडगाव विभागातील पुढील कामासाठी नामांकित नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार यांचे कडुन **ई निविदा** मागविण्यात येत आहेत.

निविदा क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम
EE/KED/ T-13/ 2026-27	*Tender for Preventive Maintenance and Erecting of Line Capacitor bank structure in Kedgaon Division of Baramati Rural Circle*	रू. ९० लाख

कोरी निविदा संच महावितरणचे संकेत स्थळावर **दि.२२.१०.२०२६ ते २८.१०.२०२६** पर्यंत डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहील. सदर निविदा शुल्क ऑनलाइन पदधतीनेच भरणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न देता कोणतीही अथवा सर्व निवीदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरी काराने स्वतः कडे राखुन ठेवला आहे. अधिक माहिती साठी व वेळोवेळी होणाऱ्या बदलांसाठी कंपनीचे संकेत स्थळ नियमित पहावे : https://etender.mahadiscom.in/eatApp/.

फोन क्र.७८७५७६८१४७

पीआरओ क्र. PRO/No/133/2026-27

कार्यकारी अभियंता, केडगाव विभाग

महानिर्मिती महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

इ-निविदा सूचना
क्र.ना.औ.वि.कें/२०२६-२७/३१

अ. क्र.	निविदा क्र./ विभाग	निविदा तपशील	अंदाजे रक्कम (रु.) इसारा रक्कम (रु.)
१.	३००००७२६२५ ईएम	स्टेज २ येथिल वॉल सुट ब्लोअर/ व्हॉल्व्ह मोटरची देखभाल आणि गोदावरी व दारणा पंप हाऊस, वर्कशॉप व स्टेज १ चे आय पी एच येथिल एल टी मॉडयुलचे देखभाल कंत्राट	८,२३,४३४/- ११,६९०/-
२.	३००००७२६२७ ईएम	एलटी स्विचगिअर आणि सुटे भागांची खरेदी.	४४,१५,२६०/- ४७,६१०/-
३.	३००००७२७५८ आयअॅन्डसी	संच क्र. ३,४ आणि ५ च्या कोल मिलसाठी लोअर रिजेक्ट गेट आणि अप्पर रिजेक्ट गेट न्यूमॅटिक पॉवर सिलिंडर्सची खरेदी.	७,१४,१२०/- १०,६००/-
४.	३००००७२६८२ बीएम	युनिट ३,४ आणि ५ मधील आयडी फॅन एएन२५ई६ इम्पेलर्सच्या री-ब्लेडिंग (पात्यांची पुनर्बसवणूक)/ री-कंडिशनिंग (नूतनीकरण/दुरुस्ती) चे काम.	५४,००,०००/- ५७,५००/
५.	३००००७२६८३ डब्लुटीपी	एस.टी.पी, स्टेज-२ च्या देखभाल-दुरुस्ती कामासाठी कंत्राट.	३,१२,६४०/- ६,६३०/-
६.	३००००७२५८७ सिव्हिल	कंपाऊंड भिंतीच्या विविध ठिकाणी माइल्ड स्टील ग्रिल बसवण्याचे काम.	२,५५,३२८/- ६,१००/
७.	३००००७२६७९ सिव्हिल	स्टेज-२ एकलहरे येथील विविध आरसीसी सिव्हिल संरचनांच्या दुरुस्ती व बळकटीकरणाचे काम (आवश्यकतेनुसार).	१०,९९,७७८/- १५,०००/-
८.	३००००७१७६३ एयुसी	ॲश डॅम मध्ये उपलब्ध असलेल्या ॲक्च्युल पॉन्ड ॲशचे प्रमाण मोजण्यासाठी सर्वेक्षण करण्याचा करार.	९,९७,१९३/- १३,४९०/-
९.	३००००७२८२७ सीएचपी	चौदा आसनी दोन स्कुलबस भाडयाने घेणे.	१६,५६,४३७/- २०,०१५/-
१०.	३००००७२८१० टीएम	संच ४ सीओएच दरम्यान बॉयलर ते टर्बाइन (एमएस, एचआरएच, सीआरएच), उच्च तापमान, उच्च दाब रेषा, ड्रिपलाईन, एम एस व्हॉल्वस्, ड्रेन लाईन्स आणि बॉयलर कंट्रोल रूम (पीसीआर) वर एलआरबी मॅट्रेस इन्सुलेशन काढणे आणि पुरवठा करून बसवण्यासाठी कामाचा करार.	३७,९१,४७६/- ४१,४५०/-
११.	३००००७२६९७ सिव्हिल	कॉलनीतील रुग्णालय इतारतीला बाह्या रंगकाम पुरवणे आणि लागू करणे.	४,१९,८०५/- ७,७००/-
१२.	३००००७२८१६ बीएम	संच क्र. ३,४,५ बॉयलरच्या आयडी फॅन्स आणि इतर संबंधित कामासाठी वार्षिक कामाचा करार.	१८,२२,७४६/- २१,७३०/-
१३.	३००००७२८१७ बीएम	आरएसडी/शॉर्ट शटडाउन दरम्यान संच क्र. ३,४ आणि ५च्या बॉयलरमधील झिजलेल्या जीएस लाईन्स बदलण्याचे आणि संबंधित इतर कामे.	७,३०,४६०/- १०,८१०/-
१४.	३००००७२८१८ बीएम	कोल मिल एक्सआरपी ७६३ च्या हॉट एअर डॅम्पर्स आणि हॉट एअर गेट्स साठी विविध सुटे भाग खरेदी करणे.	१५,७०,६०४/- १९,२१०/-
१५.	३००००७२८१९ बीएम	२१० मेगावॅट बॉयलरच्या आयडी फॅन एएन२५ई६ साठी मुख्य शाफ्टची पुनर्स्थिती, बदलण्यायोग्य व्हेन हाऊसिंगची संपूर्ण दुरुस्ती व पुनर्स्थिती, तसेच या व्हेन हाऊसिंगवर धूप-प्रतिरोधक लेपन करण्याबाबतचे कार्य कंत्राट.	४६,६२,५२२/- ५०,१३०/-
१६.	३००००७२८२० बीएम	संच क्र ३,४ आणि ५ बॉयलरमध्ये एओएच आणि विविध आरएसडी आऊटेज दरम्यान बॉयलर टयुबच्या विना-विध्वंसक चाचण्या करण्यासाठी कामाचा करार.	२,७४,१०८/- ६,२५०/-
१७.	३००००७२८२१ बीएम	संच क्र. ३,४ आणि ५ बॉयलर येथे ईएसपी इनलेट डक्टच्या गळतीसाठी शॉर्ट आउटेज/ आरएसडी दरम्यान दुरुस्तीसाठी वार्षिक कंत्राट.	१०,१७,५५९/- १३,६८०/-

नविन विक्रेते/ नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया **https://eprocurement.mahagenco.in** येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक
औ.वि.केंद्र, एकलहरे

RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १५, अंक - ०९] | शुक्रवार, ऑक्टोबर १६, २०२६ / आश्विन २४, शके १९४८ | [पृष्ठे ०४

असाधारण क्रमांक ०९

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी यांजकडून

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ (१) नुसार.

अधिसूचना

क्रमांक पीएलसी/कावि/५१०/२०१६. - ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना क्रमांक पीएलसी/कावि/६४९/२०२५, दिनांक ४ डिसेंबर २०२५ अन्वये प्राथमिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

जिल्हा पुणे, तालुका शिरूर, गावाचे नाव बाभुळसर खुर्द

प्रकरण क्रमांक २१/२०२५

अ. क्र.	गट नंबर	संयुक्त मोजणीनुसार संपादित करावयाचे क्षेत्र (हे.आर)
१	२	३
१.	२४ पैकी	०.१७००
२.	२५ पैकी	०.२४००
३.	२६ पैकी	०.४८००
४.	२८ पैकी	०.३५००
५.	२९ पैकी	०.०७००
६.	३० पैकी	१.२६००
७.	३१ पैकी	१.५७००

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- पाझर तलाव, बाभुळसर खुर्द.

प्रकल्पाचे वर्णन :- पाझर तलाव, बाभुळसर खुर्द प्रकल्पाकरिता भूसंपादन.

समाजाला मिळणारे लाभ :- गावातील ग्रामस्थांकरिता सिंचन व पिण्याच्या पाण्याची सोय.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

जिल्हा पुणे, तालुका शिरूर, गावाचे नाव बाभुळसर खुर्द

अ. क्र.	भूमापन क्रमांक / गट क्रमांक	क्षेत्र (हे.आर./चौ.मी.)
लागू नाही.		

अनुसूची - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश: लागू नाही.

टीप :- उक्त जमिनींच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यांचे कार्यालय, जुनी जिल्हा परिषद इमारत, ३ रा मजला, पुणे-४११ ००१ येथे निरीक्षण करता येऊ शकेल.

जितेंद्र डूडी (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, १२ ऑक्टोबर २०२६

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ (१) नुसार,

अधिसूचना

क्रमांक पीएलसी/कावि/५११/२०१६. - ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना क्रमांक पीएलसी/कावि/६४८/२०२५, दिनांक ४ डिसेंबर २०२५ अन्वये प्राथमिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

जिल्हा पुणे, तालुका शिरूर, गावाचे नाव कान्हूर मेसाई (यमाईदरा)

प्रकरण क्रमांक २२/२०२५

अ. क्र.	गट नंबर	संयुक्त मोजणीनुसार संपादित करावयाचे क्षेत्र (हे.आर)
१	२	३
१.	६४२ पैकी	१.४८
२.	६४३ पैकी	०.६३
३.	६४४ पैकी	०.३०
४.	६४५ पैकी	०.३०
५.	६४६ पैकी	०.२०

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- पाझर तलाव, कान्हूर मेसाई (यमाईदरा).

प्रकल्पाचे वर्णन :- पाझर तलाव, कान्हूर मेसाई (यमाईदरा) प्रकल्पाकरिता भूसंपादन.

समाजाला मिळणारे लाभ :- गावातील ग्रामस्थांकरिता सिंचन व पिण्याच्या पाण्याची सोय.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन जिल्हा पुणे, तालुका शिरूर, गावाचे नाव कान्हूर मेसाई (यमाईदरा)

अ. क्र.	भूमापन क्रमांक / गट क्रमांक	क्षेत्र (हे.आर./चौ.मी.)
लागू नाही.		

अनुसूची - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश:- लागू नाही.

टीप :- उक्त जमिनींच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यांचे कार्यालय, जुनी जिल्हा परिषद इमारत, ३ रा मजला, पुणे-४११ ००१ येथे निरीक्षण करता येऊ शकेल.

जितेंद्र डूडी (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, १२ ऑक्टोबर २०२६

जिमाका/पुणे/जाहिरात/२९०/२०२६-२७

थोडक्यात पण महत्वाचे

L&T Finance

एल अँड टी फायनान्सचा दुसऱ्या तिमाहीत ९७५ कोटींचा विक्रमी नफा

मुंबई : दैनिक संध्या

एल अँड टी फायनान्स लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीत कंपनीने ९७५ कोटी रुपयांचा विक्रमी एकत्रित करपश्चात नफा नोंदवला असून, मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत त्यात ३३ टक्क्यांची वाढ झाली आहे. कंपनीचा एकत्रित कर्ज पोर्टफोलिओ २८ टक्क्यांनी वाढून १,३६,६३५ कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. कंपनीच्या किरकोळ कर्ज व्यवसायातही लक्षणीय वाढ झाली आहे. किरकोळ कर्ज पोर्टफोलिओ २९ टक्क्यांनी वाढून १,३४,६०० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. तसेच, तिमाहीतील किरकोळ कर्जवितरणात २७ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली असून, या कालावधीत एकूण २४,०२७ कोटी रुपयांचे कर्जवितरण करण्यात आले. मालमत्तेच्या गुणवत्तेत झालेली सुधारणा, कर्जावरील खर्चात झालेली घट आणि मालमत्तेवरील परताव्यात झालेली वाढ यांमुळे कंपनीच्या नफ्यात सुधारणा झाल्याचे स्पष्ट होते. एल अँड टी फायनान्सने २०३१ पर्यंत जोखीम व्यवस्थापन, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित किरकोळ वित्तीय सेवा संस्था बनण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. ग्राहक मिळवणे, पतमूल्यांकन, कर्ज पोर्टफोलिओचे व्यवस्थापन, ग्राहक सेवा आणि पूरक वित्तीय उत्पादने उपलब्ध करून देणे अशा विविध प्रक्रियांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढवण्यात येत आहे.



नेक्सस वेस्टएंड आणि द पॅव्हिलियन मॉलमध्ये सांस्कृतिक उत्सवाची पर्वणी

पुणे : दैनिक संध्या

सणासुदीच्या काळात पुण्यातील नेक्सस वेस्टएंड आणि द पॅव्हिलियन मॉलमध्ये भारतीय संस्कृती, कला आणि परंपरांचा अनोखा अनुभव पुणेकरांना घेता येणार आहे. रामायणावर आधारित सजावट, वारली कला, कथाकथन, कला स्पर्धा आणि पारंपरिक नृत्य सादरीकरण अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नेक्सस वेस्टएंड मॉलमध्ये रामायण या महाकाव्यावर आधारित आकर्षक उत्सवी सजावट करण्यात आली आहे. जलाशयाच्या पार्श्वभूमीवर उभारलेला भव्य मंडप, त्याकडे जाणारा पूल तसेच रामसेतू आणि अशोकवाटिका यांसारख्या प्रसंगांचे सादरीकरण हे या सजावटीचे प्रमुख आकर्षण आहे. ३१ ऑक्टोबर रोजी मुलांसह प्रौढांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा आणि रामकथा सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. एक नोव्हेंबर रोजी कला स्पर्धा होणार आहे. दरम्यान, द पॅव्हिलियन मॉलमध्ये 'वारली दिवाळी' या संकल्पनेतून महाराष्ट्राच्या पारंपरिक वारली कलेचे आधुनिक रूप सादर करण्यात आले आहे. १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरदरम्यान आयोजित या उपक्रमात वारली कलेपासून प्रेरित कलात्मक स्थापना, इन्फिनिटी रूम, छायाचित्रांसाठी विशेष कमान आणि प्रकाशमान वारली कंदील यांचा समावेश आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस विशेषतः गांव नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस, आमचे आशील १) श्रीमती लिलाबाई तुकाराम शेळके २) सौ. नयना उमेश कराळे, नं. १ व २ रा. धनगरवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे नं. १ हल्ली वस्ती अंजनाबाई चाळ, खोली नं. १५, गणेश नगर, साईनाथ नगर रोड, घाटकोपर पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र ४०००८६ आज समक्ष जुन्नर यांनी प्रत्यक्ष सांगितलेवरून व दिलेल्या माहितीप्रमाणे जाहीररित्या कळविणेत येते ते येणे प्रमाणे :-

१) मिळकतिचे वर्णन :- तु. व जि. पुणे, पो. तु. ता. व पं. स. जुन्नर, जि. प. पुणे पैकी ग्रामपंचायत नारायणगावचे हद्दीतील खाते क्र. १३५८ वरील मिळकत.

स.नं. /ग.नं.	क्षेत्र हे. आर	आकार रू. पै.
१३५	५.०५.५० पो.ख. ०.०५.०० एकूण ५.१०.५०	१०.५३
यापैकी समाईकातील अविभक्त हिश्याचे क्षेत्र		

येणे प्रमाणे वर्णनाच्या शेतजमिनी त्यातील झाडझाडोरा तदंगभूत वस्तू व जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह. आमचे आशील तसेच श्री. शांताराम सतू शेळके, श्री. विलास सतू शेळके, श्री. परशुराम सतू शेळके, श्री. साईराज अनिल शेळके, सर्वजण रा. धनगरवाडी, पो. नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०४ यांचे कुटुंबाचे मुळ पुरूष कोंडाजी शेळके हे होते. सदरहू कोंडाजी यांना सतू कोंडाजी शेळके, नामदेव कोंडाजी शेळके, जगन्नाथ कोंडाजी शेळके व रघुनाथ कोंडाजी शेळके ही मुले होती. सदरहू सतू कोंडाजी शेळके यांना तुकाराम, शांताराम, विलास, अनिल व परशुराम ही मुले होती. यापैकी तुकाराम सतू शेळके हे दि. १०/१०/२०२४ रोजी मयत झाले असून त्यांना आमचे आशील नं. १ व २ हे कायदेशीर वारस आहेत. त्याचप्रमाणे सतुचे उपरोक्त वारसांपैकी अनिल सतू शेळके हे देखील दि. २४/०९/२००२ रोजी मयत झाले असून त्यांना श्री. साईराज अनिल शेळके हे वारस आहेत. वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही आमचे आशील व श्री. शांताराम सतू शेळके, श्री. विलास सतू शेळके, श्री. परशुराम सतू शेळके, श्री. साईराज अनिल शेळके यांचे वडिलोपार्जीत मालकी ताबेवहिवाटीची मिळकत असून सदरहू मिळकतीमध्ये श्री. शांताराम सतू शेळके, श्री. विलास सतू शेळके, श्री. परशुराम सतू शेळके यांचा प्रत्येकी १/१० इतका मालकी हक्क व हिस्सा असून आमचे आशील नं. १ व २ यांचा मयत तुकाराम यांचे वारस म्हणून समाईकात १/१० इतका मालकी हक्क व हिस्सा आहे. तसेच श्री. साईराज अनिल शेळके यांचा मयत अनिल सतू शेळके यांचे वारस म्हणून समाईकात १/१० इतका हिन्दू कायद्याप्रमाणे मालकी हक्क व हिस्सा आहे. अशी वर नमूद केलेप्रमाणे वस्तुस्थिती असताना व आमचे आशिल नं. १ व २ यांचा वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये १/१० इतका मालकी हक्क व हिस्सा असताना व त्या क्षेत्रामध्ये आमचे आशिल नं. १ व २ यांचा प्रत्यक्ष ताबा वहिवाट असतानाही वर नमूद इसम नामे श्री. शांताराम सतू शेळके, श्री. विलास सतू शेळके, श्री. परशुराम सतू शेळके, श्री. साईराज अनिल शेळके हे वर नमूद मिळकतीमधील आमचे आशिलांचा हिस्सा डावलून तसेच त्याअनुषंगाने काही अनुचीत लाभ उठविण्याचे हेतुने वर नमूद जमिनीचे संदर्भात काही अनाधिकाराचा, बिनताब्याचा एव्हढेच नव्हेतर अम्मलबजावणीस अपात्र असा हस्तांतराचा व्यवहार करणेचे प्रयत्नात असून काही लोकांशी वर नमूद इसम नामे श्री. शांताराम सतू शेळके, श्री. विलास सतू शेळके, श्री. परशुराम सतू शेळके, श्री. साईराज अनिल शेळके यांनी बोलणी केल्याचे व तशी गिऱ्हाईके जमीन पाहाण्याकरिता येत असल्याचे आमचे आशिलांस खात्रीलायकरित्या समजते.

तरी सर्व लोकांस अशी समज देणेत येते की,

वर नमूद जमिनीचे संदर्भात कोणीही श्री. शांताराम सतू शेळके, श्री. विलास सतू शेळके, श्री. परशुराम सतू शेळके, श्री. साईराज अनिल शेळके यांचेबरोबर कोणीही खरेदी, विक्री, दान, गहाण, लिज, बक्षीस अगर अन्य कुठल्याही प्रकारे तबदिलीचा व्यवहार व त्याअनुषंगाने करार-मदार करू नयेत. एव्हढेच नव्हेतर कुठल्याही वित्त पुरवठा करणारे संस्थेने वर नमूद जमिनीवर संबंधीत इसमांना कर्ज पुरवठा करू नये अन्यथा तसले कुठलेही हस्तांतराचे व्यवहार त्याचप्रमाणे करार-मदार, गहाणखते, आमचे आशिलांचे वर नमूद मिळकतीमधील मालकी हक्कावर व ताब्यावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आगावू प्रसिध्दीस दिली असे.

कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. २१/१०/२०२६

SHIVAM G. NAYAKODI
B.Com. LL.B.
ADVOCATE
Mob. No. 7758919787
Offi. New ST Stand, Shivansh Building,
Falt no. 302, Second floor,
Junnar, Dist. Pune 410502.



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्षातर्फे नवदुर्गा सन्मान सोहळा व दांडिया महोत्सव उत्साहात संपन्न

पिंपरी : दैनिक संध्या

दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्षाच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त नवदुर्गा सन्मान सोहळा आणि दांडिया महोत्सवाचे आयोजन भोसरी एमआयडीसी, टी-ब्लॉक येथील दुर्गा ब्रिगेड संपर्क कार्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला भगिनींचा सन्मान करण्यात आला. प्रवरानगर, सांगली, बारामती आणि मुंबईसह विविध भागांतून पुरस्कारार्थी महिला या सोहळ्यास उपस्थित होत्या. दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष कु. दुर्गा भोर यांच्या हस्ते मान्यवर महिला भगिनींना नवदुर्गा पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी अभय दादा भोर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना महिला सक्षमीकरण, महिलांचा सन्मान, सामाजिक कार्य आणि उद्योग क्षेत्रातील महिलांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे स्वागत उद्योग विभागाच्या वतीने रेश्मा मुल्ला यांनी केले, तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा अध्यक्ष अवंतिका भोर यांनी मांडले. जयश्री साळुंखे, दुर्गा ब्रिगेड संपर्कप्रमुख यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संपर्कप्रमुख राईसा पठाण, शहर उपाध्यक्ष रमाबाई बनसोडे, पुणे उपाध्यक्ष दीपली चव्हाण, माही शेख, कामगार आघाडीचे निरंजन मनोहर, युवा अध्यक्ष आकाश बनसोडे, कामगार आघाडीचे उपाध्यक्ष अमोल चव्हाण व कदीर पठाण तसेच क्रीडा विभागाचे अशोक बेलापूरकर यांनी विशेष योगदान दिले. नवदुर्गा सन्मान सोहळ्यानंतर आयोजित दांडिया महोत्सवात महिला व इतर सहभागी स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. उत्कृष्ट दांडिया सादर करणाऱ्या अनेक स्पर्धकांना विशेष पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. सन्मान सोहळा आणि दांडिया महोत्सवामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. महिलांच्या कर्तृत्वाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेणे आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. उपस्थित महिला भगिनी आणि कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

वाढत्या लोकसंख्येसाठी २.५ एमएलडी क्षमतेचा जलकुंभ उभारण्याची मागणी

■ प्रभाग क्रमांक २८ मधील आरक्षण क्र. ४/११२ मधून १५ ते २० गुंठे जागा उपलब्ध करून देण्याची मागणी

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपळे सौदागर परिसरातील वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पाण्याची गरज दिवसेंदिवस वाढत असून, भविष्यात नागरिकांना पुरेसा आणि सुरळीत पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी २.५ दशलक्ष लिटर प्रतिदिन (एमएलडी) क्षमतेचा जलकुंभ उभारण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील प्रभाग क्रमांक २८ मधील आरक्षण क्र. ४/११२ (खेळाचे मैदान – पीजी) या आरक्षित जागेतून सुमारे १५ ते २० गुंठे जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. पिंपळे सौदागर परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. या भागात मोठ्या निवासी इमारती आणि गृहप्रकल्पांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने लोकसंख्येतही मोठी भर पडत आहे. परिणामी, पाणीपुरवठ्यावरील ताण वाढण्याची शक्यता असून, वाढत्या गरजांचा विचार करून पाणीपुरवठ्याचे दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक बनले आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित आरक्षित जागेतून आवश्यक क्षेत्र उपलब्ध करून जलकुंभ उभारल्यास परिसरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यास मदत होऊ शकते. तसेच भविष्यातील वाढत्या लोकसंख्येची पाण्याची गरज लक्षात घेऊन नियोजन करणे शक्य होणार आहे. त्यामुळे नागरिकांना नियमित आणि पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरू शकतो. यासंदर्भात महानगरपालिका प्रशासनाने संबंधित जागेची पाहणी करावी, नियमानुसार आवश्यक मंजुरी आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करावी, तसेच जलकुंभ उभारणीसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. पिंपळे सौदागरमधील वाढते नागरीकरण आणि पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता, प्रस्तावित जलकुंभाच्या उभारणीबाबत महानगरपालिका प्रशासन काय भूमिका घेते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

'यशोप्रवेश-२०२६' कार्यक्रम उत्साहात संपन्न

पिंपरी : दैनिक संध्या

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस), चिंचवड येथे एमबीए, एमसीए बीबीए व बीसीए अभ्यासक्रमाच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय 'यशोप्रवेश-२०२६' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने झाले. संचालक डॉ. शिवाजी मुंढे यांनी स्वागत केले. संस्थेचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना शिस्त आणि ध्येयनिष्ठेचे महत्त्व पटवून दिले.प्रमुख पाहुणे एल एस ऑटोमोटिव्ह कंपनीच्या मनुष्यबळ व्यवस्थापन आणि प्रशासन विभागाचे उपमहाव्यवस्थापक प्रसाद दीक्षित यांनी उद्योग क्षेत्राच्या अपेक्षा स्पष्ट केल्या, तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. धनंजय मांडलिक यांनी चाणक्य नीतीचा व्यवस्थापनातील वापर उलगडला. डॉ. हॅरोल्ड डीकोस्टा यांनी सायबर सुरक्षेचे महत्त्व सांगितले.दुसऱ्या दिवशी मौसमी निलाखे यांनी प्रेरणादायी सत्र घेतले. तिसऱ्या दिवशी ॲड. सीमा शर्मा यांनी पॉश कायद्याबाबत मार्गदर्शन केले, तर डॉ. कॅप्टन सी.एम. चितळे यांनी व्यावसायिक नीतिमत्ता आणि व्यवस्थापन शिक्षणावर प्रकाश टाकला.

पीसीयूची शैक्षणिक गुणवत्ता आणि उद्योग क्षेत्राशी समन्वय ठेवण्याची बांधिलकी

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता, तांत्रिक प्रगती आणि उद्योग क्षेत्राशी अर्थपूर्ण समन्वय ठेवण्याची बांधिलकी असल्याचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे एआय उदयोन्मुख तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी राष्ट्रीय आयइइइ परिसंवादात उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. सोनवणे बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, एमआयटी विद्यापीठ, सिम्बायोसिस विद्यापीठ, टी. बी. सानस महाविद्यालय, डी. वाय. पाटील विद्यापीठ कोल्हापूर, एआयएसएसएमएस, सिंहगड इन्स्टिट्यूट आणि संदिप विद्यापीठ यांसह विविध शैक्षणिक संस्थांतील ११० प्रतिनिधी सहभागी झाले होते. "एआय चलित अभियांत्रिकी शिक्षण" या चर्चेत उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. उच्च तंत्रज्ञान देवाणघेवाण, उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा अभ्यास आणि उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ करण्याबाबत, एआय आधारित उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि त्यांचे व्यावहारिक उपयोग यावर तज्ञांनी चर्चा केली.

भाजपाची नैतिकता संपली का : धनराज आसवानी



■ पिंपरी (दै. संध्या)

आर्थिक गुन्ह्यातील आरोपीच्या कार्यक्रमाला भाजपाचे पाठबळ - धनराज आसवानी

मुलचंदानी यांनी विजयादशमी निमित्त पिंपरी येथे रावण दहन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे या कार्यक्रमात शहर भाजपचे पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे फलक पिंपरी चिंचवड शहरात लावण्यात आले आहेत. सेवा विकास बँकेत ५०० कोटी पेक्षा जास्त रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप अमर मूलचंदानी व इतर संचालक मंडळ, व्यवस्थापक यांच्यावर आहे. या आरोपाखाली मूलचंदानी व पुणे जिल्ह्यातील एककाळच्या नामांकित दि सेवा विकास सहकारी बँकेत आर्थिक घोटाळे करण्यात जबाबदार असल्याचा आरोप असणारे अमर इतरांना अटक देखील झाली आहे. सध्या अमर मूलचंदानी हे वैद्यकीय उपचाराच्या कारणास्तव जामीन घेऊन बाहेर आहेत. अशा गंभीर गुन्ह्यातील आरोपींच्या कार्यक्रमास पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्षांसह अनेक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत म्हणजे पिंपरी चिंचवड भाजपाची नैतिकता संपली का असा प्रश्न माजी अध्यक्ष सेवा विकास सहकारी बँक धनराज आसवानी यांनी उपस्थित केला आहे.

पिंपरी चिंचवड शहरासह पुणे शहर व पुणे जिल्ह्यातील छोटे-मोठे व्यापारी, उद्योजक, शेतकरी यांच्या आर्थिक विकासात हातभार लावणारी विश्वासू बँक म्हणजे सेवा विकास सहकारी बँक असा या बँकेचा नावलौकिक होता. या बँकेत तीनशे कोटी रुपये पेक्षा जास्त आर्थिक घोटाळे केल्याचा आरोप जाधवर समितीने अमर मूलचंदणी व तत्कालीन संचालक मंडळ व्यवस्थापक व बँकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर ठेवला आहे. या प्रकरणी मूलचंदानी आणि इतरांना न्यायालयीन कोठडी सोनवण्यात आलेली आहे. कायद्यातील पळवाटा शोधून या आरोपींनी वैद्यकीय उपचाराच्या नावाखाली न्यायालयातून जामीन मिळवला आहे आणि राजरोसपणे अशा सामाजिक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून न्यायालयाच्या व सर्वसामान्य नागरिकांच्या डोळ्यात हे धूळफेक करत आहेत. ज्यांनी या बँकेतील शेकडो कर्मचाऱ्यांना बेरोजगार केले, हजारो नागरिकांनी विश्वासाने ठेवलेल्या पैशाचा अपहार केला, सहकार क्षेत्राला व पिंपरी चिंचवड शहरातील व्यापाऱ्यांच्या नावाला काळीमा फासला आणि मा. न्यायालयाने वैद्यकीय उपचारासाठी दिलेल्या जामीनचा गैरवापर करत आहेत अशा आर्थिक गुन्ह्यातील आरोपीच्या कार्यक्रमाला भाजपाचे पाठबळ मिळणे म्हणजे भाजपाची नैतिकता संपुष्टात आली आहे आणि या गोरगरीब नागरिकांच्या पैशाच्या अपहारास भाजपाचा देखील पाठिंबा आहे असा आरोप आणि माजी अध्यक्ष सेवा विकास सहकारी बँक धनराज आसवानी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केला आहे.

हिंदू शौर्य दिनानिमित्त रविवारी चिंचवड येथे विराट हिंदू मेळावा

■ पिंपरी (दै. संध्या)

■ हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचे पुरस्कार जाहीर

नवरात्र उत्सव व विजयादशमी निमित्त हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी, (दि. २५) हिंदू शौर्य दिन - विराट हिंदू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात ज्येष्ठ प्रवचनकार डॉ. संजय उपाध्ये हे 'धर्मसंस्थापनार्थाय' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत अशी माहिती संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. उत्तम दंडीमे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.



रविवारी, सकाळी ११ वाजता, चिंचवडगाव प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे होणाऱ्या या मेळाव्यात 'भिकाऱ्यांचे डॉक्टर' म्हणून सामाजिक क्षेत्रात नावलौकिक प्राप्त झालेले डॉ. अभिजीत सोनवणे यांना 'स्व. प्रा. एकनाथजी नाणेकर स्मृती समाजभूषण पुरस्कार २०२६' हा पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ पत्रकार अविनाश चिलेकर यांना 'स्व. संजय आर्य स्मृती पत्रकार भूषण पुरस्कार २०१६' आणि निलंगा येथील श्री राधाकृष्ण फाउंडेशनचे संस्थापक आकाश बालाजीराव सोळंके यांना 'कार्य गौरव पुरस्कार २०२६' हा पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष राजाभाऊ गोलांडे, सचिव सुहास पोफळे आणि समन्वयक कैलास बारणे यांनी दिली.

कुमार जाधव, दत्तात्रय सूर्यवंशी, अतुल आचार्य, नामदेव शिंत्रे, विजय गुंजाळ, दिगंबर रिद्धीवाडे, हेमदेव थापर, मनोज बोरसे, शिवाजी रेड्डी, दिलीप कुलकर्णी, रमेश अर्धाले, गोविंद बोळे, श्रीमती अलका आर्य, तेजस्विनी जटाळ, पद्मेश कुलकर्णी, बापू मिरजकर, संजय भाट, रमेश अर्धाले यांनी या 'हिंदू शौर्य दिन - विराट हिंदू मेळावा'च्या संयोजनात सहभाग घेतला आहे.

विजयादशमीनिमित्त आकुर्डीत शस्त्रपूजन सोहळा उत्साहात

■ निगडी (दै. संध्या)



विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची उपस्थिती

ऐश्वर्यम सोसायटी, निगडी नगर (देहू गट) यांच्या वतीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव व शस्त्रपूजनाचा सोहळा ऐश्वर्यम कम्फर्ट,आकुर्डी मागील पालिका मैदान येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष आमदार अण्णा बनसोडे, नगरसेवक कैलास कुटे, मीनल यादव, विशाल काळभोर, गणेश लंगोटे यांची विशेष उपस्थिती लाभली. पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे समरसता गतिविधी सहसंयोजक विलासराव लांडगे यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. विजयादशमीच्या पावन पर्वानिमित्त शस्त्रपूजन करून राष्ट्रभक्ती, शिस्त, संस्कार, सामाजिक समरसता आणि राष्ट्रसेवेचा संकल्प दृढ करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात अमृतवचन, सुभाषित, सांघिक पद्य, वैयक्तिक पद्य आणि प्रार्थना अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तुषार कुलकर्णी यांनी मुख्य शिक्षक, धनंजय पुराणिक यांनी कार्यक्रमाची रूपरेषा, निखिल भोसले यांनी प्रास्ताविक परिचय, मंगेश अवसेकर यांनी अमृतवचन, पुरुषोत्तम कुलकर्णी यांनी सुभाषित, तर नाना कुलकर्णी यांनी पद्य सादर .केले, इतर स्वयंसेवकांनीही व्यवस्थापन, सजावट, शस्त्रपूजन, पाहुणचार आणि विविध व्यवस्थांसाठी मोलाचे योगदान दिले. सर्व कार्यकर्त्यांच्या नियोजनबद्ध सहभागातून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. अशा उपक्रमांमधून समाजात एकात्मता, संघभावना, संस्कार आणि राष्ट्रहिताची जाणीव अधिक दृढ होण्यास मदत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, निगडी नगर (देहू गट) यांच्या वतीने कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे, स्वयंसेवकांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

नगरसचिव नियुक्तीप्रकरणी उल्हास जगताप यांच्या नियुक्तीची चौकशी करा!

औद्योगिक न्यायालयाच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते सचिन काळभोर यांची मागणी

■ पिंपरी (दै. संध्या)

अनिल खामकर यांना न्यायालयाच्या आदेशानुसार देय नुकसानभरपाई व लागू व्याज अदा करावे आणि निवेदनावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल द्यावा, अशी मागणी सचिन काळभोर यांनी केली आहे. महानगरपालिकेतील नियुक्त्या या नियम, गुणवत्ता आणि पारदर्शकतेच्या आधारे व्हाव्यात. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून कायदेशीर चौकटीत योग्य निर्णय घ्यावा, असे काळभोर यांनी निवेदनात म्हटले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील नगरसचिव पदाच्या नियुक्तीप्रकरणी औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या पार्श्वभूमीवर उल्हास जगताप यांच्या नियुक्तीची वैधता तपासून नियमानुसार कार्यवाही करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा भाजप कार्यकर्ते सचिन सुदाम काळभोर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी संबंधित प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे. पुणे येथील औद्योगिक न्यायालयाचे न्यायाधीश डी. एम. पाटील यांनी २७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रकरण क्रमांक २०२/२०१५ मध्ये दिलेल्या आदेशानुसार, अनिल खामकर यांना डावलून उल्हास जगताप यांची नगरसचिव पदावर नियुक्ती करताना अनुचित कामगार प्रथेचा अवलंब झाल्याचे घोषित करण्यात आल्याची माहिती निवेदनात नमूद करण्यात आली आहे. तसेच खामकर यांना ५० हजार रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश महापालिकेला देण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे. निर्धारित मुदतीत नुकसानभरपाई न दिल्यास वार्षिक १० टक्के दराने व्याज देण्याची तरतूद असल्याचा उल्लेखही करण्यात आला आहे. निवेदनानुसार, नगरसचिव पदासाठी झालेल्या लेखी परीक्षेत अनिल खामकर यांनी १४० गुण मिळवून सर्वाधिक गुण प्राप्त केले होते. उल्हास जगताप यांना ११८, संतोष पवार यांना १२०, तर चंद्रशेखर म्हस्के यांना ९६ गुण मिळाले होते. असे असतानाही पहिली निवड प्रक्रिया रद्द करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या जाहिरातीत पात्रतेच्या अटी आणि निवड पद्धतीत बदल करण्यात आल्याचा आक्षेप खामकर यांनी न्यायालयात घेतल्याचे निवेदनात नमूद आहे. महानगरपालिकेतील महत्त्वाच्या पदांवरील नियुक्त्या करताना मंजूर सेवा नियम, पात्रतेचे निकष, गुणवत्ता आणि पारदर्शकता यांचे पालन होणे आवश्यक आहे. न्यायालयाच्या निकालामुळे नगरसचिव पदाच्या निवड प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होत असल्याने संपूर्ण प्रक्रियेची प्रशासकीय व कायदेशीर तपासणी करावी, अशी भूमिका काळभोर यांनी मांडली आहे.

नगरसचिव पदासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या दोन्ही जाहिराती, मंजूर सेवा नियम, लेखी परीक्षेचे गुण, पात्र उमेदवारांची यादी, मुलाखतीचे गुण आणि निवड समितीचे इतिवृत्त यांची सखोल चौकशी करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. दुसऱ्या जाहिरातीत अनुभवाची अट समाविष्ट करण्यामागील नियम, तसेच निवड पद्धतीत बदल करण्यासाठी कोणाची मान्यता घेण्यात आली होती, याचीही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. औद्योगिक न्यायालयाच्या आदेशातील निरीक्षणे आणि लागू सेवा नियमांच्या आधारे उल्हास जगताप यांच्या नियुक्तीची वैधता तपासावी. नियुक्ती नियमबाह्य असल्याचे निष्पन्न झाल्यास सक्षम प्राधिकरणामार्फत कायद्यानुसार पुढील कार्यवाही करावी. तसेच संबंधित अधिकारी किंवा निवड समितीच्या सदस्यांकडून नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास जबाबदारी निश्चित करून आवश्यक कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

१८२ उमेदवार रिंगणात

■ पिंपरी (दै. संध्या)

महाराष्ट्र विधान परिषदेच्या औरंगाबाद, पुणे व नागपूर विभागातील तीन पदवीधर तसेच अमरावती व पुणे विभागातील दोन शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार असून, पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी पाचही मतदारसंघांत २ हजार ४१९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, १० लाख ६८ हजार ७२ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. या पाचही मतदारसंघांतील विद्यमान सदस्यांची मुदत ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येत असल्याने भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ही निवडणूक घेण्यात येत आहे.

संत तुकाराम नगरमध्ये प्रथमच सीमोल्लंघन सोहळा

माजी खासदार अमर साबळे यांच्या हस्ते प्रारंभ; पथसंचलन आणि सोनं लुटण्याच्या परंपरेतून सामाजिक ऐक्याचा संदेश

■ पिंपरी (दै. संध्या)



दसरा आणि विजयादशमीच्या मंगलमय पर्वानिमित्त संत तुकाराम नगर आणि वल्लभनगर परिसरात प्रथमच सीमोल्लंघन, पथसंचलन आणि सोनं लुटण्याचा पारंपरिक सांस्कृतिक सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांच्या पुढाकारातून आयोजित या उपक्रमाचा प्रारंभ माजी खासदार अमर साबळे यांच्या हस्ते २० ऑक्टोबर रोजी करण्यात आला. या सोहळ्यात शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि सांस्कृतिक परंपरांच्या जतनाचा संदेश दिला. विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर दुपारी तीन वाजता राष्ट्रीय श्रमिक आघाडी आणि संत तुकाराम नगर सहकारी गृह रचना संस्था मर्यादित यांच्या वतीने सीमोल्लंघन आणि पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची संकल्पना आणि नियोजन कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी केले होते. माजी खासदार अमर साबळे यांच्या हस्ते पथसंचलनाचा शुभारंभ झाल्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य रॅलीला सुरुवात झाली.

संत तुकाराम नगर येथील राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या कार्यालयापासून निघालेल्या रॅलीदरम्यान जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर स्वामींच्या मंदिरात पुष्पहार अर्पण करण्यात आला, तर बुद्धविहारात भगवान गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. गंगानगर ते अक्षय सोसायटी, वायसीएम रुग्णालय या मार्गावरील सीमोल्लंघन सोहळ्यापूर्वी माजी नगरसेवक बबनराव गाढवे, भाजप नेते किरण सुवर्णा, भाजप मंडलाध्यक्ष मंगेश धाडगे, भाजप नेते नंदू आप्पा कदम, महेंद्र बाविस्कर, दिनेश पाटील, शेखर पाटील आणि संदीप नाईक यांच्यासह कार्यकर्त्यांनी माजी खासदार अमर साबळे आणि यशवंतभाऊ भोसले यांचे श्रीफळ देऊन स्वागत केले.

त्यानंतर वल्लभनगर आणि संत तुकाराम नगर यांच्या सीमारेषेवरील गणेश मंदिरात पारंपरिक सीमोल्लंघनाचा कार्यक्रम पार पडला. दोन्ही परिसरांतील नागरिकांनी एकत्र येत श्री गणेशाचे दर्शन घेतले आणि सोनं लुटण्याच्या परंपरेत सहभाग घेतला. आपट्याची पाने एकमेकांना देत विजयादशमीच्या शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. या परंपरेतून परस्परांतील स्नेह, प्रेम, बंधुभाव आणि एकात्मतेची भावना अधिक दृढ झाली. या कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांची सहा वर्षांची नात लिनेशा हिने प्रथमच पथसंचलन आणि सोनं लुटण्याच्या पारंपरिक सोहळ्यात सहभाग घेतला. नव्या पिढीपर्यंत सांस्कृतिक परंपरा पोहोचविण्याच्या दृष्टीने तिचा सहभाग लक्षवेधी ठरला. यावेळी बोलताना माजी खासदार अमर साबळे म्हणाले की, विजयादशमीच्या सीमोल्लंघनाच्या परंपरेतून दुःखातून सुखाकडे आणि पराभवातून यशाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा मिळते. यशवंतभाऊ भोसले यांनी वल्लभनगर आणि संत तुकाराम नगर परिसरात हा उपक्रम सुरू करून सांस्कृतिक परंपरेच्या माध्यमातून सामाजिक ऐक्याचा नवा आदर्श निर्माण केला आहे. भविष्यात या परिसराचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास लिहिला जाईल, तेव्हा या उपक्रमाची निश्चितच नोंद घेतली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

थोडक्यात पण महत्वाचे



विष्णुपंत चव्हाण मित्र मंडळाकडून विविध मान्यवरांचा वाढदिवस साजरा

बारामती : दैनिक संध्या

बारामती येथील सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या विष्णुपंत चव्हाण मित्र मंडळातर्फे डॉ.शशांक जळक,पत्रकार तैनुर शेख आणि विपुल ढवाण पाटील यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक सत्यव्रत अर्जुनराव काळे हे होते. विष्णुपंत चव्हाण मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत चव्हाण,चिऊशेठ जंजिरे,नरेंद्र मिसाळ,विठ्ठल आगवणे,फोटोग्राफर प्रशांत कुचेकर,रोहन भोसले,फौजी नेताजी बुरूंगले इ.मान्यवर उपस्थित होते.या वाढदिवसाचे औचित्य साधत चैतन्य हॉस्पीटलमधील कर्मचाऱ्यांना मिक्सर आणि माजी उपमुख्यमंत्री व लोकनेते अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे वाटप करून साजरा करण्यात आला.प्रथमतः सुत्रसंचालन सलीम सय्यद यांनी स्वागतपर गीत गाऊन कार्यक्रमाची सुरूवात केली. उपस्थित मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. हॉस्पीटलमध्ये उत्कृष्ठ सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी डॉ.शशांक जळक,पत्रकार तैनुर शेख व विपुल ढवाण पाटील यांचा केप कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.याप्रसंगी तैनुर शेख,डॉ.शशांक जळक व सत्यव्रत काळे यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक चिऊशेठ जंजिरे यांनी केले. सुत्रसंचालन सलिम सय्यद तर शेवटी आभार विष्णुपंत चव्हाण यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विष्णुपंत चव्हाण मित्र मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकारी तसेच चैतन्य हॉस्पीटलच्या कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

इंदापूर तालुक्यातील बावडा येथील आठवडे बाजार २३ ऑक्टोबरला बंद



वालचंदनगर : दैनिक संध्या

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया शांततेत व निर्भय वातावरणात पार पडावी, यासाठी पुणे जिल्ह्यातील मतदान केंद्र निश्चित केलेल्या काही गावांमधील आठवडे बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत. इंदापूर तालुक्यातील मौजे बावडा येथे शुक्रवारी आठवडे बाजार बंद राहणार आहे. याशिवाय आंबेगाव तालुक्यातील पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक व घोडेगाव, खेड तालुक्यातील राजगुरुनगर आणि बारामती तालुक्यातील लोणीभापकर येथील आठवडे बाजारही बंद राहणार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी संबंधित गावांतील व्यापारी, ग्रामपंचायत आणि नागरिकांनी प्रशासनाच्या आदेशांचे पालन करावे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

गोकुळ संघात विजय आणि बारामतीत सतेज पाटील यांचे भावी मुख्यमंत्री म्हणून बॅनर



बारामती : दैनिक संध्या

नुकत्याच कोल्हापूर येथे पार पडलेल्या निवडणुकीत श्री.सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या नेतृत्वाखाली गोकुळ दूध संघात संचालक पदी उमेदवार भरघोस मताधिक्याने विजयी झाले आहेत.अशातच राजकारणाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बारामती शहरातील काँग्रेस पक्ष कार्यालय,पंचायत समिती जवळ व अनेक चौकांमध्ये सतेज उर्फ बंटी पाटील यांचे भावी मुख्यमंत्री म्हणून तसेच गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन अशा शुभेच्छा आशयांचे बॅनर लावल्यामुळे बारामती तालुक्यासह परिसरात राजकीय चर्चांना वेगळेच उधाण आल्याचे दिसून येत आहे.

चाकणला संग्राम दुर्ग किल्ल्यात शिवकालीन शस्त्रांचे पूजन



चाकण : दैनिक संध्या

किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने चाकण येथील संग्राम दुर्ग किल्ल्यात शिवकालीन शस्त्रांचे पूजन करण्यात आले. प्रारंभी पोलीस उपनिरीक्षक नरवडे व ॲड. किरण झिंजुरके यांच्या हस्ते दामोदर महाराज व छत्रपती श्री शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून शस्त्र पूजन करण्यात आले. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके यांनी पुष्पहार अर्पण केल्यानंतर मार्गदर्शन केले. चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी जितेंद्र कदम व गुन्हे शाखेचे अधिकारी अधरवाढ यांच्या हस्ते सांज आरती करण्यात आली. योग प्रात्यक्षिके तसेच शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिक करण्यात आले. पारंपारिक सिमोल्लंघन व रावण दहनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी ॲड. किरण झिंजुरके, सत्यवान तांबे, राहुल वाडेकर, किशोर घुमटकर, बाबासाहेब दिघे, राजीव दीक्षित, ॲड. किशोर झिंजुरके, पाटील साहेब, किशोर परदेशी, संतोष पडवळ, भालचंद्र झिंजुरके, अनंत देशमुख, अशोक शिवळे, युवराज कड, समर्थ झिंजुरके, सुरज झिंजुरके, स्वराज झिंजुरके, योगेश साखरे, नामदेव पानसरे, शिवप्रसाद परदेशी, संदीप शिंदे आदी उपस्थित होते.

विठ्ठलराव काकडे यांचे निधन



कोरेगावमुळ : दैनिक संध्या

पूर्व हवेली तालुक्यातील कोरेगावमुळ येथील सामाजिक कार्यकर्ते - जेष्ठ नागरिक - सेवानिवृत्त एसटी महामंडळाचे डायवर विठ्ठलराव सदाशिव काकडे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रविण काकडे यांचे वडील आहे. ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय काकडे यांचे चुलते आहे.

इंदापूर तालुक्यात ४८ हजार ९८९ हेक्टरवरील पंचनामे पूर्ण

पुणे जिल्ह्यातील आठ तालुक्यांत ८५ टक्के पंचनामे पूर्ण; शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा

■ इंदापूर (दै. संध्या)



खरीप हंगाम २०२६ मध्ये पर्जन्यमानातील तूट व अन्य नैसर्गिक घटकांमुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील बाधित क्षेत्रांचे पंचनामे सुरू आहेत. यामध्ये इंदापूर तालुक्यातील ४८ हजार ९८९ हेक्टर क्षेत्रावरील पंचनामे पूर्ण करण्यात आले आहेत. जिल्ह्यात ट्रिगर १ अंतर्गत समाविष्ट आठ तालुक्यांमध्ये आतापर्यंत ८५ टक्के पंचनामे पूर्ण झाले असून उर्वरित काम सुरू आहे. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान लक्षात घेऊन शासनाच्या निर्देशानुसार पुणे जिल्ह्यातील ट्रिगर १ अंतर्गत भोर, वेल्हा, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर या आठ तालुक्यांमध्ये, तर ट्रिगर २ अंतर्गत आंबेगाव व जुन्नर या दोन तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील ट्रिगर १ अंतर्गत आठ तालुक्यांमधील एकूण ३ लाख ८ हजार ९५४ हेक्टर क्षेत्रापैकी २ लाख ६१ हजार ३१४ हेक्टर क्षेत्रावरील पंचनामे पूर्ण करण्यात आले आहेत. यामध्ये एकूण ४ लाख ८६ हजार १८९ खातेदारांच्या पंचनाम्यांचा समावेश आहे. इंदापूर तालुक्यात ४८ हजार ९८९ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाले असून, जिल्ह्यातील तालुकानिहाय आकडेवारीत इंदापूरचा महत्त्वाचा समावेश आहे. इतर तालुक्यांमध्ये भोर येथे १२ हजार ९२६ हेक्टर, वेल्हा येथे ४ हजार ८२२ हेक्टर, खेड येथे ३९ हजार १२९ हेक्टर, शिरूर येथे ३० हजार ११० हेक्टर, बारामती येथे ५२ हजार १३० हेक्टर, दौंड येथे ३९ हजार ९९७ हेक्टर आणि पुरंदर येथे ३३ हजार २११ हेक्टर क्षेत्रावरील पंचनामे पूर्ण झाले आहेत.

दरम्यान, दुसऱ्या टप्प्यात दुष्काळ जाहीर झालेल्या आंबेगाव व जुन्नर तालुक्यांमध्ये सुमारे २५ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. आंबेगाव तालुक्यात ५ हजार २१७ खातेदारांच्या १ हजार १०७ हेक्टर क्षेत्राचे, तर जुन्नर तालुक्यात १२ हजार ९७ खातेदारांच्या ८ हजार १३५ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे पूर्ण करण्यात आले आहेत. दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार मदत व सवलती मिळण्याच्या दृष्टीने पंचनाम्यांना महत्त्व आहे. त्यामुळे इंदापूर तालुक्यातील उर्वरित पंचनामे लवकर पूर्ण होऊन बाधित शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

काळदरी येथील कन्यांचे वैदिक मंत्रघोषात केले पूजन

■ काळदरी (दै. संध्या)

काळदरी येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज काळदरी या विद्यालयात नवरात्रीच्या पावन पर्वाचे औचित्य साधत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळदरी व काळदरी अंगणवाडी येथील ११ व इयत्ता पाचवी मधील १५ कन्यांचे कन्यापूजन करण्यात आले. कन्यापूजन करताना सर्व कन्यांचे वैदिक मंत्र घोषात पाद्यपूजन करून विधिवत पूजन केले व नंतर कन्यांचे औक्षण करुन वह्या व खाऊ भेट देण्यात आले. "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उध्दारी." या म्हणी नुसार नारी ही शक्तीस्वरूप आहे, स्त्री शक्ती ज्याचा मागे तो यशस्वी आहे. प्रत्येक दुर्गापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. त्याचा एक प्रयत्न म्हणून हा कार्यक्रम घेतला. असे विद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग दुर्गाडे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले यावेळी त्यांनी कन्यांचे पूजन करून लहान मुलींचे पाय धुऊन आशीर्वाद घेतले. नवरात्रीनिमित्त सध्या घरोघरी उत्साहाचे, आनंदाचे वातावरण आहे. ज्यांच्या घरी घट बसलेले आहेत, त्यांच्या घरी तर या दिवसांत विशेष लगबग असते. नवरात्रीनिमित्त कित्येक वेगवेगळे कार्यक्रमही आयोजित केले जातात. त्यापैकीच एक आहे कन्यापुजन. नवरात्रीच्या नऊ दिवसांत मुलींना देवीस्वरुप मानून त्यांची पूजा केली जाते. नऊही दिवस त्यासाठी खास असले तरी अष्टमीच्या दिवशी कन्यापुजनाला विशेष महत्त्व आहे.

बौद्ध विहार येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

■ माळेगाव (दै. संध्या)



माणसाला माणसासारखे जिवन जगता यावे यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धर्मांतर हि ऐतिहासिक, सामाजिक क्रांती आहे असे प्रतिपादन सहायक पोलिस निरीक्षक कुलदीप संकपाळ यांनी केले.माळेगाव शहरातील बौद्ध विहारात धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन माजी सभापती संजय भोसले,उद्योजक सुनील वाघमारे,संदीप आढाव, सागर मोटे, रोहित लोंढे, राहुल चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी विजय भोसले यांनी त्रीशरण,पंचशील व धम्मवंदना घेतली.यावेळी बोलताना सहायक पोलिस निरीक्षक कुलदीप संकपाळ म्हणाले की,बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या धर्मांतरामुळे बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन झाले असून त्या धर्माचे अनुकरण केल्याने लाखो नागरिकांचे जीवनमान उंचावले आहे. बौद्ध धर्म स्विकारले अनेकांनी कर्मकांड नाकारून विज्ञानवाद स्विकारला आहे.यावेळी रिपाइंचे तालुका युवकाध्यक्ष विश्वास भोसले,सुनील भोसले,पिनु खरात,अजित भोसले, दत्तात्रय भोसले, अमोल भोसले, मयुर भोसले, निहाल भोसले,विराज भोसले, दिपक भोसले, योगेश भोसले उपस्थित होते. दरम्यान रमामाता नगर येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आण्णा घोडके, सुरेश भोसले, संजय वाघमारे, विशाल घोडके, निवृत्ती साळवे, प्रल्हाद शिंदे आदी उपस्थित होते.

■ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धर्मांतर हि ऐतिहासिक, सामाजिक क्रांती आहे-कुलदीप संकपाळ

लावण्या बागलेचा युवा लेखिका म्हणून गौरव!

■ 'The Water Guardian' या पुस्तकाच्या लेखन व प्रकाशनाबद्दल 'The Young Author's Recognition' पुरस्काराने सन्मानित

■ भिवंडी (दै. संध्या)



सेंट झेवियर्स हायस्कूल, नवी मुंबई (St. Xavier's High School, Navi Mumbai) येथे इयत्ता सातवी, विभाग 'बी'मध्ये शिक्षण घेणाऱ्या कुमारी लावण्या अंजली विजयकुमार बागले हिने लेखन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. 'The Water Guardian' या पुस्तकाचे लेखन करून ते BriBooks या व्यासपीठावर प्रकाशित केल्याबद्दल तिला *'The Young Author's Recognition'* या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. National Young Authors Fair 2026-27 या उपक्रमांतर्गत मिळालेला हा सन्मान तिच्या सर्जनशीलतेची, कल्पकतेची आणि साहित्यिक प्रतिभेची पोचपावती ठरला आहे. 'The Water Guardian' या पुस्तकाच्या शीर्षकातून पाणीसंवर्धन आणि जलसंपत्तीचे संरक्षण यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांबाबत जागरूकता निर्माण करण्याचा संदेश अधोरेखित होतो. लहान वयातच पुस्तकलेखन करून ते प्रकाशित करण्याची लावण्याची कामगिरी तिची लेखनाविषयीची आवड, कल्पक विचारशक्ती, जिद्द आणि सर्जनशील अभिव्यक्ती यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. तिच्या या यशामुळे बालवयातच वाचन आणि लेखनाची गोडी जोपासणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळेल. लावण्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाचे अध्यक्ष-डॉ. विशाल कडणे, दिलीप बागले,नंदा बागले, शशिकला सोनवणे, केशव बागले, डॉ. आरती बागले, विजय बागले, अंजली बागले, प्रशांत बागले, सौ. रसिका बागले, स्वप्निल सोनवणे, कु. पार्थ बागले, कु. नेहल बागले, कु. मृणमय बागले, कु. प्रियांश बागले, तसेच तिचे काका-मावशी, सर्व नातेवाईक, शाळेतील शिक्षकवृंद आणि समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे. लहान वयातच साहित्यविश्वात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्याच्या दिशेने पहिले महत्त्वपूर्ण पाऊल टाकणाऱ्या लावण्याच्या पुढील साहित्यिक वाटचालीसाठी सर्वांनी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. तिच्या हातून भविष्यातही दर्जेदार, प्रेरणादायी आणि समाजोपयोगी साहित्यनिर्मिती घडो, अशाही सदिच्छा यावेळी अनेकांनी व्यक्त केल्या.

सतीश वाघोले यांच्याकडे एमपीएससी अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार

■ नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर तालुक्यातील आळे गावचे सुपुत्र आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य मा.श्री.सतीश बबन वाघोले साहेब यांच्याकडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे आळे गावासह संपूर्ण जुन्नर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या आदेशानुसार सतीश वाघोले यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आयोगाचे कामकाज सुरळीतपणे सुरू ठेवणे आणि विविध प्रशासकीय प्रक्रिया प्रभावीपणे पार पाडणे, अशी जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे. सतीश वाघोले यांनी महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाचे माजी प्रमुख सचिव म्हणून काम पाहिले आहे. आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय कारकिर्दीत त्यांनी विधी, न्याय आणि संसदीय कार्य विभागात महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. कायद्याचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पुणे सत्र न्यायालयात वकिलीही केली. त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा आणि कायदेविषयक ज्ञानाचा उपयोग आता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामकाजासाठी होणार आहे. आळे या गावातून आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर राज्यस्तरावरील महत्त्वाच्या पदापर्यंत पोहोचलेल्या सतीश वाघोले यांचे यश तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. एमपीएससीच्या परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता राखणे, उमेदवारांचे हित जपणे आणि आयोगावरील विश्वास अधिक दृढ करणे, यासाठी त्यांच्या अनुभवाचा फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

विषबाधा होऊन पंधरा शेळ्यांचा मृत्यू

बावीस शेळ्या आत्यवस्थ : खेड तालुक्यातील कुरुळी हद्दीतील घटना





■ चाकण (दै. संध्या)

रासायनिक दूषित पाणी प्यायल्याने मेंढपाळाच्या पंधरा शेळ्यांचा तडफडून मृत्यू झाला. तर अन्य बावीस शेळ्या गंभीर अवस्थेत आहेत. अगदी दसरा या सणाच्या दिवशी घडलेल्या या घटनेमुळे मेंढपाळ सखाराम पांडू कोकरे (मूळ रा. केडगाव, चौफुला, ता. दौंड) यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. मृत शेळ्यांच्या शवविच्छेदन अहवालात विषारी रासायनिक पाण्यामुळे शेळ्यांचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच खेड पंचायत समितीच्या सभापती गौरी मुऱ्हे आणि पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. बाधित मेंढपाळाला शासनाकडून योग्य आर्थिक भरपाई मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन गौरी मुऱ्हे यांनी दिले आहे. औद्योगिक प्रदूषणामुळे पशुधन धोक्यात आले आहे. चाकण, महाळुंगे आणि कुरुळी औद्योगिक पट्ट्यात रासायनिक सांडपाणी नाले, तलाव तसेच मोकळ्या जागांमध्ये सोडले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. दूषित पाण्यामुळे पशुधनाचा मृत्यू झाल्याच्या घटना यापूर्वीही अनेकदा घडल्या आहेत. सप्टेंबर २०२५ मध्ये महाळुंगे येथे रासायनिक पाणी प्यायल्याने १८ मेंढ्यांचा मृत्यू झाला होता. जून २०२६ मध्येही दूषित पाण्यामुळे ४५ मेंढ्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. आता कुरुळीतील या घटनेमुळे हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. औद्योगिक सांडपाण्याची वेळेवर विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. नाल्यांमधील पाण्याची गुणवत्ता आणि प्रदूषण करणाऱ्या घटकांवरील नियंत्रण याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व औद्योगिक प्रशासनाने यावर नियंत्रण व अंकुश ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे पर्यावरणासह पशुधनावर अवलंबून असलेल्या मेंढपाळांचेही मोठे आर्थिक नुकसान होत आहे. दूषित पाणी सोडणाऱ्या घटकांची तातडीने ओळख करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, सांडपाणी सोडण्याच्या ठिकाणांची नियमित तपासणी करावी आणि बाधित मेंढपाळाला नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

"मेंढपाळ सखाराम कोकरे हे दौंडहून मेंढ्या व शेळ्यांचा तांडा घेऊन पायी अलिबागला जाण्याच्या तयारीत असताना खेड तालुक्यात हा प्रकार घडला. या घटनेत तब्बल पाच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. शासनाने त्यांना तातडीने नुकसान भरपाई देऊन न्याय द्यावा. अन्यथा कंपनी आणि प्रशासना विरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल."
- सखाराम सरक, अध्यक्ष, महाराष्ट्र मेंढपाळ आक्रोश आंदोलन

थोडक्यात पण महत्वाचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पोलीस हुतात्म्यांना अभिवादन

मुंबई : दैनिक संध्या

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या वर्षभरात संपूर्ण देशात शहीद झालेल्या पोलीस हुतात्म्यांना नायगाव पोलीस मुख्यालय येथील पोलीस स्मृतीस्तंभावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली. असीम ध्येयनिष्ठेने कर्तव्य बजावताना वीरगती प्राप्त झालेल्या ३६ पोलीस अधिकारी आणि ११८ पोलीस अंमलदार अशा एकूण १५४ पोलीस हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतींना मी विनम्रपणे अभिवादन करतो, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त करून पोलीस हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण केले. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, महापौर रितू तावडे, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी यावेळी पुष्पचक्र वाहून पोलीस हुतात्म्यांना अभिवादन केले. पोलीस दलाच्या वतीने बंदुकीच्या फैरी झाडून हुतात्म्यांना मानवंदना देण्यात आली. विविध देशांच्या दूतावासातील निमंत्रित, वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्यासह शहीद पोलिसांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वांची भेट घेऊन त्यांना अभिवादन केले. अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) मधुकर पाण्डेय आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) अभिषेक त्रिमुखे यांनी पोलीस स्मृतीदिन संचलन कार्यक्रमाचे संयोजन केले. ज्यांनी आपल्या कर्तव्यनिष्ठेपोटी स्वतःचे प्राण अर्पण केले त्या शूर शहीद पोलिसांना आदरांजली वाहण्यासाठी दरवर्षी दि २१ ऑक्टोबर रोजी स्मृती संचलन केले जाते. दि. १ सप्टेंबर २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राज्य तसेच अर्ध सैनिक दलातील शहीद झालेल्या पोलिसांचा सन्मान करण्यासाठी या पोलीस स्मृतीदिन संचलनाचे आयोजन करण्यात आले.



बंधन म्युच्युअल फंडाची नवी मोहीम पगाराच्या आनंदाला जोडते

मुंबई : दैनिक संध्या

महिन्याच्या शेवटी खात्यात पगार जमा झाल्याचा संदेश मिळताच चेहऱ्यावर उमटणारे मोठे हास्य अनेकांसाठी आनंदाचा खास क्षण असतो. याच परिचित भावनेला आर्थिक नियोजनाच्या संकल्पनेशी जोडत बंधन म्युच्युअल फंडाने 'बत्तीस वाली स्माईल' ही नवी जाहिरात मोहीम सादर केली आहे. 'सॅलरी वाला प्लॅन' या उपक्रमाचा भाग असलेली ही चित्रफीत विनोद, दैनंदिन जीवनातील प्रसंग आणि सहज समजणाऱ्या संवादांच्या माध्यमातून सिस्टिमॅटिक विथड्रॉवल प्लॅन (एसडब्ल्यूपी) या गुंतवणूक पर्यायाची माहिती देते. महिन्याच्या शेवटी ३१ तारखेनंतर काय येते, असा प्रश्न विचारल्यास सर्वसाधारणपणे उत्तर मिळते, एक तारीख. मात्र, बंधन म्युच्युअल फंडाच्या नव्या जाहिरातीत याचे उत्तर '३२' असे दिले जाते. कारण, पगार जमा झाल्यानंतर चेहऱ्यावर उमटणारे आनंदाचे हास्य म्हणजेच या मोहिमेतील 'बत्तीस वाली स्माईल'! या संकल्पनेवर आधारित चित्रफितीत एक व्यक्ती दैनंदिन जीवनातील विविध प्रसंगांमध्ये ३१ नंतर ३२ येते, असा अजब आग्रह धरते. त्याच्या या तर्कामुळे आजूबाजूचे लोक गोंधळून जातात. मात्र, अखेरीस या विधानामागील गमतीशीर अर्थ उलगडतो. त्याच्यासाठी ३२ ही कॅलेंडरवरील तारीख नसून, पैसे जमा झाल्यानंतर चेहऱ्यावर उमटणाऱ्या आनंदी हास्याचे प्रतीक आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश सिस्टिमॅटिक विथड्रॉवल प्लॅन ही आर्थिक संकल्पना सर्वसामान्यांना सोप्या पद्धतीने समजावून सांगणे हा आहे. एसडब्ल्यूपीच्या माध्यमातून गुंतवणूकदार त्यांच्या म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीतून ठराविक कालांतराने निश्चित रक्कम काढू शकतात. उर्वरित गुंतवणूक बाजारातील कामगिरीनुसार वाढण्याची किंवा कमी होण्याची शक्यता असते. पगारदार व्यक्तींप्रमाणेच उद्योजक, स्वतंत्रपणे काम करणारे व्यावसायिक आणि निवृत्त व्यक्तींनाही नियमित पैशांचे महत्त्व असते. या सर्वांच्या आयुष्यातील समान भावनिक अनुभवाला एसडब्ल्यूपीच्या संकल्पनेशी जोडून ती अधिक सहज आणि परिचित करण्याचा प्रयत्न या मोहिमेत करण्यात आला आहे.

बप्पी लाहिरी यांच्या संगीताचा वारसा सदैव प्रेरणा देत राहील : मुख्यमंत्री



मुंबई : दैनिक संध्या

दिवंगत संगीतकार आणि गायक बप्पी लाहिरी यांनी आपल्या संगीताने, गीतांनी आणि अनोख्या शैलीने अनेक दशके संपूर्ण संगीत रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या संगीताचा प्रभाव देशाच्या सीमा ओलांडून जगभर पोहोचला.त्यांची अनेक गाणी आजही लोकप्रिय आहेत. बप्पी लाहिरी यांचे जीवन आणि संगीताचा वारसा सदैव प्रेरणा देत राहील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अंधेरी येथील जुहू परिसरात दिवंगत संगीतकार व गायक बप्पी लाहिरी यांच्या निवासस्थानाजवळील मार्गाचे 'संगीतकार बप्पी लाहिरी मार्ग' असे नामकरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या सोहळ्याला ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र, ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ, ज्येष्ठ गायक उदित नारायण यांच्यासह चित्रपटसृष्टी आणि संगीत क्षेत्रातील मान्यवर, तसेच बप्पी लाहिरी यांचे कुटुंबीय आणि चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बप्पी लाहिरी यांच्या स्मृतींना उजाळा देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बप्पीदा हे केवळ एक लोकप्रिय संगीतकार नव्हते, तर त्यांनी आपल्या संगीताद्वारे अनेक पिढ्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला. त्यांनी संगीतविश्वात अनेक नवे प्रयोग केले. विशेष म्हणजे, भारताबाहेरही त्यांच्या गाण्यांना मोठी लोकप्रियता मिळाली असून, रशियन फेडरेशनमध्येही त्यांची गाणी आजही मोठ्या प्रमाणावर गायली आणि ऐकली जातात. आजचा हा कार्यक्रम केवळ मार्गाच्या नामकरणापुरता मर्यादित नसून, त्यांच्या समृद्ध जीवनाचा आणि संगीतप्रवासाचा गौरव करण्याचा आहे. त्यांच्या गाण्यांचे स्मरण हा एक संगीतमय प्रवास असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या आठवणींसोबतच त्यांची असंख्य गाणी आपल्या मनात पुन्हा जागी होतात. त्यांच्या जीवनाचा गौरव करण्याची संधी मिळणे, ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. बप्पी लाहिरी यांच्या नावाने या मार्गाचे नामकरण करून त्यांच्या संगीतक्षेत्रातील अतुलनीय योगदानाच्या स्मृती जतन करण्याचा आणि त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

पिरामल फायनान्सच्या निव्वळ नफ्यात ६७ टक्क्यांची वाढ

- दुसऱ्या तिमाहीत ५४५ कोटींचा नफा
- भांडवली आधार मजबूत करण्यासाठी ३,८५० कोटी रुपये उभारले
- व्यवस्थापनाखालील मालमत्ता १.१३ लाख कोटींवर

■ मुंबई (दै. संध्या)

पिरामल फायनान्स लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीत कंपनीचा निव्वळ नफा मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत ६७ टक्क्यांनी वाढून ५४५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत कंपनीने १,००६ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला असून, त्यातही वार्षिक तुलनेत ६७ टक्क्यांची वाढ झाली आहे.

कंपनीच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्तेतही लक्षणीय वाढ झाली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत २४ टक्क्यांची वाढ नोंदवत ही मालमत्ता १,१३,११२ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. जुना बंद केलेला व्यवसाय वगळता कंपनीच्या वाढीशी संबंधित मालमत्तेत ३० टक्क्यांची वाढ झाली आहे. यावरून कंपनीच्या कर्ज व्यवसायाचा विस्तार आणि आर्थिक कामगिरीतील सकारात्मक प्रगती स्पष्ट होते. पिरामल फायनान्सच्या किरकोळ कर्जवाटपात मागील वर्षाच्या तुलनेत ३४ टक्क्यांची वाढ होऊन ते १४,६४६ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. ग्राहकांकडून कर्जाची सातत्यपूर्ण मागणी आणि कंपनीच्या व्यवसायविस्ताराला मिळणारा प्रतिसाद याचे हे द्योतक मानले जात आहे.

कंपनीने देशभरातील आपले जाळेही विस्तारले आहे. सध्या २५ राज्यांमधील ६२१ शहरांत कंपनीच्या ८३८ शाखा कार्यरत आहेत. तसेच, कंपनीच्या ग्राहकसंख्येत वार्षिक तुलनेत २६ टक्क्यांची वाढ होऊन ती ६५ लाखांवर पोहोचली आहे. शाखांचे विस्तारणारे जाळे आणि वाढता ग्राहकवर्ग यांमुळे देशभरातील कंपनीची उपस्थिती अधिक मजबूत झाली आहे.

पिरामल फायनान्स लिमिटेडचे अध्यक्ष आनंद पिरामल यांनी कंपनीच्या कामगिरीविषयी समाधान व्यक्त केले. दुसऱ्या तिमाहीत व्यवसायवाढ, नफा आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या बाबतीत कंपनीने चांगली प्रगती केली असल्याचे त्यांनी सांगितले. कंपनीच्या वाढीशी संबंधित मालमत्तेत वार्षिक तुलनेत ३० टक्क्यांची वाढ झाली असून, पहिल्यांदाच भांडवल उभारताना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांनी दाखवलेला विश्वास प्रोत्साहन देणारा असल्याचे त्यांनी नमूद केले. डीएचएफएलच्या विलीनीकरणाला या तिमाहीत पाच वर्षे पूर्ण झाली आहेत. हा कंपनीच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगताना त्यांनी नमूद केले की, या काळात कंपनीने विविध वित्तीय सेवा पुरवणाऱ्या संस्थेकडून किरकोळ कर्ज व्यवसायावर अधिक लक्ष केंद्रित करणाऱ्या संस्थेपर्यंत प्रगती केली आहे. सध्या कंपनी देशभरातील सुमारे ६५ लाख ग्राहकांना सेवा देत आहे.

ग्राहकांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त करताना, अधिकाधिक लोकांना औपचारिक कर्जसुविधा उपलब्ध करून देण्यावर कंपनीचा भर राहील, असे पिरामल यांनी स्पष्ट केले. ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी शाखांच्या जाळ्यासोबतच तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढविण्यात येणार आहे. दीर्घकालीन आणि मजबूत वित्तीय संस्था उभारणे, व्यवसायात सातत्यपूर्ण वाढ साधणे आणि नफाक्षमता टिकवून ठेवणे हे कंपनीचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले. नफ्यातील वाढ, किरकोळ कर्जवाटपाचा विस्तार, भांडवल उभारणी आणि ग्राहकसंख्येतील वाढ या बाबींमुळे पिरामल फायनान्सने आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या सहामाहीत मजबूत कामगिरी नोंदवली आहे. आगामी काळात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, विस्तारणारे शाखांचे जाळे आणि ग्राहककेंद्रित वित्तीय सेवा यांच्या माध्यमातून व्यवसायवाढ कायम ठेवण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

दिनेश कुमार खारा यांची स्वतंत्र संचालकपदी नियुक्ती

कंपनीने भारतीय स्टेट बँकेचे माजी अध्यक्ष दिनेश कुमार खारा यांची पाच वर्षांच्या कालावधीसाठी स्वतंत्र संचालक म्हणून नियुक्ती केल्याची घोषणा केली आहे. वित्तीय सेवा क्षेत्रातील जवळपास चार दशकांचा अनुभव असलेल्या खारा यांच्या नियुक्तीमुळे कंपनीच्या धोरणात्मक निर्णयप्रक्रियेला आणि प्रशासनाला लाभ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

व्यवसायवाढीसाठी ३,८५० कोटींचे भांडवल उभारले

भविष्यातील व्यवसायविस्ताराला चालना देण्यासाठी आणि भांडवली आधार मजबूत करण्यासाठी कंपनीने एकूण ३,८५० कोटी रुपयांचे भांडवल उभारले आहे. यामध्ये पात्र संस्थात्मक गुंतवणूकदारांना समभाग जारी करून २,१०० कोटी रुपये, तर प्रवर्तक समूहाला वॉरंटचे प्राधान्याने वाटप करून १,७५० कोटी रुपये उभारण्यात आले आहेत. या भांडवलामुळे कंपनीची आर्थिक क्षमता वाढण्यास आणि किरकोळ कर्ज व्यवसायाच्या विस्तारासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांनी दाखवलेला विश्वास कंपनीच्या भविष्यातील वाटचालीसाठी महत्त्वाचा मानला जात आहे.

हिंदुस्तान झिंकच्या नफ्यात १४२ टक्क्यांची विक्रमी वाढ



- उत्पादन खर्चात घट झाल्याने आर्थिक कामगिरीला बळ
- दुसऱ्या तिमाहीत महसूल १५,०९३ कोटी रुपयांवर; जस्त आणि चांदीच्या उत्पादनातही दमदार वाढ

■ उदयपूर (दै. संध्या)

जगातील सर्वात मोठ्या एकात्मिक जस्त उत्पादक कंपन्यांपैकी एक आणि जागतिक स्तरावरील आघाडीच्या चांदी उत्पादकांमध्ये समावेश असलेल्या हिंदुस्तान झिंक लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीच्या प्रसिद्धिपत्रकानुसार, या तिमाहीत महसूल, परिचालन नफा आणि धातू उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली आहे. जस्त उत्पादनाचा खर्च कमी झाल्याने कंपनीच्या नफाक्षमतेलाही बळ मिळाले आहे. कंपनीने दुसऱ्या तिमाहीत परिचालनातून १५,०९३ कोटी रुपयांचा विक्रमी महसूल मिळवला. मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत त्यात ७७ टक्क्यांची वाढ झाली आहे. कंपनीचा व्याज, कर, घसारा आणि कर्जफेडीपूर्व नफा (ईबीआयटीडीए) ९,२८७ कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला असून, त्यात वार्षिक तुलनेत १०८ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. कंपनीने तिमाहीत ६,४१२ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवल्याचे प्रसिद्धिपत्रकाच्या मथळ्यात नमूद करण्यात आले आहे. तथापि, प्रसिद्धिपत्रकाच्या मुख्य मजकुरात निव्वळ नफ्याची रक्कम ११,८८१ कोटी रुपये दिली असल्याने अंतिम आकडेवारीची पडताळणी आवश्यक आहे. कंपनीच्या आर्थिक कामगिरीला उत्पादनातील वाढीचीही साथ मिळाली. दुसऱ्या तिमाहीत खाणीतून काढलेल्या धातूचे उत्पादन २.७१ लाख टनांवर पोहोचले, तर शुद्ध धातूचे उत्पादन २.६४ लाख टन इतके नोंदवण्यात आले. दोन्ही उत्पादनांनी विक्रमी पातळी गाठल्याचे कंपनीने म्हटले आहे. जस्त उत्पादनाच्या खर्चात झालेली घट हे या तिमाहीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले. रॉयल्टी वगळता जस्त उत्पादनाचा खर्च प्रतिटन ७०३ अमेरिकी डॉलरपर्यंत खाली आला आहे.

उत्पादन खर्चावरील नियंत्रण आणि कार्यक्षम कामकाजामुळे कंपनीची जागतिक बाजारपेठेतील स्पर्धात्मकता अधिक मजबूत होण्यास मदत होत आहे. दरम्यान, चांदीचे उत्पादन १७३ टनांवर पोहोचले असून, मागील वर्षाच्या तुलनेत त्यात २० टक्क्यांची वाढ झाली आहे. चांदीच्या उत्पादनातील या वाढीमुळे कंपनीच्या एकूण आर्थिक कामगिरीला हातभार लागला आहे. ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत कंपनीने १७,३५९ कोटी रुपयांचा ईबीआयटीडीए नोंदवला असल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद आहे.

स्त्रीला आदर्शाच्या चौकटीत अडकवू नका, तर तिच्या कर्तृत्वाला वाव द्या

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे मत : श्री भवानी माताजी जैन ट्रस्टतर्फे नवदुर्गा व आदर्श माता पुरस्कारांचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)



देवीने महिषासुर, चंड-मुंड यांसारख्या राक्षसांचा संहार केला, त्याचप्रमाणे आजची स्त्रीदेखील समाजातील आव्हानांचा सामना करत बदलाची प्रक्रिया पुढे नेत आहे. आज महिलांनी केवळ विविध क्षेत्रांत काम करण्यापुरते मर्यादित न राहता नेतृत्वाची जबाबदारीही स्वीकारली आहे. स्त्री ही केवळ त्यागमूर्ती नसून शक्ती, संघर्ष आणि कर्तृत्वाचे प्रतीक आहे. तिला आदर्शाच्या चौकटीत अडकवू नका, तर तिच्या कर्तृत्वाला वाव द्या, असे प्रतिपादन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केले. कात्रजमधील श्री भवानी माताजी जैन मंदिर ट्रस्टतर्फे नवरात्रीनिमित्त नवदुर्गा व आदर्श माता पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कात्रज-भिलारेवाडी येथील श्री चामुंडा भवानी माता मंदिरात हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. यंदाचा आदर्श माता पुरस्कार सुशीला मुथा व मंगला नाहर यांना प्रदान करण्यात आला. तसेच विमल बाफना, विद्या नाईकनवरे, एकता भन्साळी, डॉ. नीता मुंशी, प्रेरणा नाहर, ज्योती नाहर, भारती विजयजी भंडारी, नवीना पोरवाल व अनिता ओसवाल यांना विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याबद्दल नवदुर्गा सन्मान २०२६ प्रदान करण्यात आला. यावेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष श्रीकांत नाहर, महामंत्री संपतराज नाहर, खजिनदार सुभाष नाहर, उपसचिव राजेश आर. नाहर, उपखजिनदार मनोज नाहर, महिला अध्यक्षा अंजली नाहर व युवा अध्यक्ष गौरव नाहर यांच्यासह ट्रस्टचे सर्व विश्वस्त, पदाधिकारी, महिला मंडळ, युवा कार्यकर्ते व नाहर परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुणे व नागौर येथे भव्य भवानी माताजी मंदिरांच्या उभारणीत दूरदृष्टीपूर्ण व यशस्वी नेतृत्व तसेच मंदिरांच्या विकासासाठी केलेले योगदान आणि धार्मिक, सामाजिक व सेवाभावी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल श्री भवानी माताजी जैन ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष राजेश पी. नाहर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. राजेश पी. नाहर म्हणाले, भारतीय संस्कृतीत आईचे स्थान महत्त्वाचे असले, तरी कुटुंबासाठी तिने केलेला त्याग आणि संघर्ष अनेकदा दुर्लक्षित राहतो. तिच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिर हे केवळ धार्मिकच नव्हे, तर श्रद्धा, संस्कार, सेवा आणि सामाजिक एकतेचे केंद्र व्हावे, हा यामागील उद्देश आहे, असेही त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन रत्ना दहिवेलकर यांनी केले. आभारप्रदर्शन प्रकाश नाहर यांनी केले.

स्त्रीच्या नैसर्गिक सौंदर्याचा आणि आत्मप्रेमाचा उत्सव

■ मुंबई (दै. संध्या)



सणासुदीच्या उत्साहात भारतीय साडीपरंपरेचे सौंदर्य आणि स्त्रीच्या आत्मप्रेमाची भावना अधोरेखित करण्यासाठी टाटा समूहातील टायटन कंपनीचा पारंपरिक वस्त्रप्रावरणांचा ब्रँड तनायरा याने 'सोळा शृंगार' ही विशेष मोहीम सादर केली आहे. 'Aap se hi poora, har shringaar' अर्थात 'तुमच्यामुळेच प्रत्येक शृंगार पूर्ण होतो' या संकल्पनेवर आधारित ही मोहीम स्त्रीच्या नैसर्गिक सौंदर्याचा, आत्मविश्वासाचा आणि स्वतःकडे प्रेमाने पाहण्याच्या भावनेचा उत्सव साजरा करते. भारतीय संस्कृतीत शृंगाराला केवळ सजण्यापुरते महत्त्व नसून, त्याला भावनिक आणि सांस्कृतिक अधिष्ठानही आहे. विविध प्रदेशांतील परंपरा, पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या प्रथा आणि वैयक्तिक आवडीनुसार शृंगाराच्या पद्धती बदलतात. मात्र, आरशासमोर उभे राहून साडीचा पदर सावरणे, दागिने नीट करणे किंवा केसांची रचना सुधारणे हा क्षण प्रत्येक स्त्रीसाठी खास असतो. याच परिचित अनुभवाला केंद्रस्थानी ठेवत ही मोहीम स्त्रीचे व्यक्तिमत्त्व आणि तिच्या स्वतःवरील प्रेमाची भावना प्रभावीपणे मांडते. तनायराच्या 'सोळा शृंगार' या उत्सवी संग्रहामध्ये भारतीय वस्त्रपरंपरेचा समृद्ध वारसा आणि आधुनिक स्त्रीची अभिरुची यांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळतो. आलिशान रेशीम, ऑर्गन्झा, टिश्यू आणि टसर यांसारख्या विविध प्रकारच्या कापडांपासून तयार केलेल्या साड्यांमध्ये पारंपरिक विणकाम, आकर्षक नक्षीकाम आणि कुशल कारागिरांच्या हस्तकौशल्याला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. या संग्रहातील साड्यांमुळे महिलांना आपल्या आवडीनुसार पारंपरिक आणि आधुनिक शैलींचा मेळ साधता येतो. सण, कौटुंबिक समारंभ आणि विशेष प्रसंगांसाठी विविध पर्याय उपलब्ध करून देण्याचा ब्रँडचा प्रयत्न आहे.

श्री महालक्ष्मी मंदिरातर्फे 'नारी तू नारायणी' सन्मान सोहळा

सुमेधा चिथडे, डायना पंडोल, सत्यभामा देशमाने यांचा यथोचित सन्मान

■ पुणे (दै. संध्या)



प्रत्येक स्त्री मध्ये श्री महाकाली, श्री महालक्ष्मी आणि श्री महासरस्वती या आदिशक्तीच्या त्रिदेवी स्वरूपाचा वास असतो. त्यामुळे समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा 'नारी तू नारायणी' सन्मान देऊन गौरव करण्यात आला. आंतरराष्ट्रीय फेरारी महिला रेसर डायना पंडोल, ऑक्सिजन वुमन सुमेधा चिथडे, सामाजिक कार्यकर्त्या सत्यभामा बाबासाहेब देशमाने यांना श्री महालक्ष्मी मंदिरात सन्मानित करण्यात आले. श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबागच्या वतीने मंदिरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, ट्रस्टच्या विश्वस्त व उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल, विश्वस्त भरत अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी, प्रविण चोरबेले आदि मान्यवर उपस्थित होते. महावस्त्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. कार्यक्रमानंतर मान्यवरांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली.

मंजुषा नागपुरे म्हणाल्या, अनेक स्त्रिया विविध प्रकारचे समाजोपयोगी कार्य करीत असतात. त्यांचे कार्य समाजासमोर आणून त्यांचा सन्मान करणे हा वेगळा उपक्रम आहे. यामुळे बाकीच्यांना यातून प्रेरणा मिळते. संघटन आणि शक्ती यातून राष्ट्रहितासाठी कार्य व्हायला हवे, असेही त्यांनी सांगितले.


सुमेधा चिथडे म्हणाल्या, राष्ट्रभक्ती, सेवा आणि प्रेम भावनेने देशासाठी कार्य करायला हवे. आपण नेहमी उत्सवांच्या आनंदात असतो. मात्र, त्यावेळी सैनिकांची आठवण देखील ठेवायला हवी. आपण किती पैसे कमावतो, यापेक्षा सैनिकांसाठी किती देतो, हे महत्वाचे आहे. समाजातील सगळ्या गरजू घटकांसाठी काम होते. मात्र, ज्या सैनिकांमुळे आपण आहोत, त्यांचा सन्मान ठेवण्याकरिता आपण पुढाकार घ्यायला हवा. आत्मकेंद्रित न होता, राष्ट्र केंद्रित होण्याकडे वाटचाल करायला हवी, असेही त्या म्हणाल्या. सत्यभामा बाबाराव देशमाने यांनी देखील मनोगत व्यक्ती करीत आपला खडतर प्रवास सांगितला.

सुमेधा चिथडे या "सोल्जर्स इंडिपेंडंट रिहॅबिलिटेशन फाऊंडेशन" च्या संस्थापक असून त्या "ऑक्सिजन वुमन" म्हणून ओळखल्या जातात. भारतीय महिला कार रेसिंग ड्रायव्हर असलेल्या डायना पंडोल यांनी भारतीय मोटार स्पोर्टसच्या इतिहासात अनेक मोठे विक्रम रचले आहेत. तर, परभणीमधील सत्यभामा बाबाराव देशमाने या १०० मुलांची आजी आहे. स्नेहवन या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी मुलांना आपल्या लेकराप्रमाणे सांभाळले आहे. अशा या तीन वेगवेगळ्या क्षेत्रातील महिलांना "नारी तू नारायणी " पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज लाहोटी यांनी केले.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



जयाद्रीच्या डोंगर खोऱ्यात अठरा तास रंगला जेजुरीचा मर्दानी दसरा सोहळा

तलवार उचलणे स्पर्धेत अंकुश गोडसे तर कसरत स्पर्धेत नितीन कुदळे प्रथम

■ जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत व बहुजन समाजाचा लोकदेव असणाऱ्या खंडोबा देवाच्या तीर्थक्षेत्र जेजूरी नगरीत अत्यंत धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वातावरणात मर्दानी दसरा साजरा झाला. सलग अठरा तास जेजुरी गड,जयाद्री डोंगर खोरे तसेच जेजुरी नगरीत दसरा सोहळा रंगला. येळकोट येळकोट जयमल्हारचा जयघोष ,भंडाराची उधळण करीत भाविकांनी दसरा उत्सवाचा आनंद लुटला

मंगळवार दि 20 रोजी दसऱ्या दिवशी पहाटे जेजुरी गडावर श्री.खंडोबा व म्हाळसादेवीचे घट उठविण्यात आले. महापूजा अभिषेक, महाआरतीने दसरा उत्सवाला सुरुवात झाली. जेजुरी देवसंस्थान आणि मानकऱ्यांच्या हस्ते जेजुरी गड,नगारखाना शस्त्रे आदींचे पूजन करण्यात आले .

सायंकाळी ६ वाजता देवाचे मानकरी पेशवे, खोमणेपाटील, माळवदकर यांनी इशारा करताच पालखी सोहळ्याला प्रारंभ झाला. बंदुकीच्या फैरीने सोहळ्याला सलामी देण्यात आली. पालखीने मंदिर प्रदक्षिणा केल्यानंतर भंडार गृहातील श्री. खंडोबा व म्हाळसा देवीची उत्सव मूर्ती पालखीत ठेवण्यात आली आणि दसरा पालखी सोहळ्याला प्रारंभ झाला. यावेळी देवसंस्थानच्या वतीने आकर्षक हवाई फटाक्यांची आतषबाजी केली.गडावरून हा सोहळा निघताच हजारो भाविकांनी देवाचे लेण असणाऱ्या भंडाराची उधळण केली. मावळतीच्या प्रहरीला भंडाराच्या उधळणीने जेजुरी गडाला सुवर्ण नगरीचे स्वरूप आले होते. देवा तुझी सोन्याची जेजुरीचा प्रत्यय यावेळी हजारो भाविकांनी अनुभवला. दरम्यान, रात्री ९ वाजता खंडोबा देवाचे मुळ ठिकाण कडेपठार मंदिरातील उत्सव मूर्तींचा पालखी सोहळा ही सीमोल्लंघणासाठी निघाला. घडशी समाजाचे सोलो वादन, जेजुरीतील कलावंतांचा व वाघ्या मुरुळीचा देवाच्या पालखीसमोर जागर तसेच विविधरंगी शोभेच्या दारूकामामुळे तसेच फटाक्यांच्या आतिषबाजीमुळे सोहळ्याला एक ऐतिहासिक स्वरूप लाभले होते. मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास रमणा या देवभेटीच्या स्थळी डोंगर व दरीत जेजुरी गड व कडेपठार गडावरील पालखी समोरासमोर आणण्यात आल्या. देव भेटीसाठी देवाची आराधना करण्यात आली.यावेळी एक तास हवाई फटाक्यांची आकर्षक आतिषबाजी करण्यात आली देवभेटीचा हा सोहळा पाहण्यासाठी मध्यरात्री हजारो भाविक व नागरिक उपस्थित होते.

देवभेटीनंतर पेशवे तलवाच्याकाठी आपटा पूजन करून उत्सवमूर्तींचा स्पर्श आपट्याच्या झाडाला करण्यात आला आणि सोनं लुटण्यात आले. पहाटे सहा वाजता जेजुरी नगरीत पालखी सोहळ्याचे आगमन झाले. शहरात सडा रांगोळी घालून देवाचे औक्षण करून आणि पारंपारिक भुइनुळे उडवून पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले.नंदी चौकात व ठिकठिकाणी धनगर भाविक पारंपारिक गीते गात व नाचत होते नंदी चौकात पालखी सोहळा



झाल्यानंतर धनगर बांधवांनी लोकरीची उधळण पालखी वर केली. वजनाने प्रचंड जड असणारी पालखी खांद्यावर पेलवत खांदेकरी यांनी गड चढला. सकाळी सात वाजता सोहळा गडावर पोहचला. येथेही कलावंतानी देवासमोर आपल्या कलेची हजेरी सादर केली. सकाळी दहा वाजता रोजमुरा वाटप करून पालखी सोहळ्याची सांगता झाली. पालखी सोहळा समितीचे पदाधिकारी,खांदेकरी मानकरी,पुजारी सेवक वर्ग व ग्रामस्थांनी हा मर्दानी पालखी सोहळा संपन्न केला. देवस्थानच्यावतीने खंडोबा देवाचे नित्य सेवेकरी, कलावंत, पालखी सोहळ्याचे खांदेकरी मानकरी यांना मानपत्र देवून गौरविण्यात आले.

जेजुरी गडावर दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी होणारी 22 किलो वजनाची तलवार उचलणे व कसरती करण्याची स्पर्धा आता देश विदेशात प्रसिद्ध झाली आहे. हि स्पर्धा पाहण्यासाठी राज्याच्या विविध भागातून भाविक येथे येतात. ऐतिहासिक काळात श्रीमंत पेशवे यांच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात तोफखाण्याची जवाबदारी पुरंदरच्या मल्हार गडाचे सरदार पानसे यांच्याकडे आली. सरदार महिपतराव पानसे व रामराव पानसे हे तोफखाण्याचे प्रमुख होते. सरदार पानसे हे खंडोबा देवाचे निस्सीम भक्त होते. युद्धावर जाताना खंडोबा देवाला केलेल्या नवसाची पूर्ती म्हणून सरदार पानसे यांनी देवाला 22 किलो वजनाची तलवार व कासवाच्या पाठीची ढाल अर्पण केली होती.

४२ किलो वजनाची तलवार देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचे व स्थानिक नागरिकांचे आकर्षण ठरले गेली अनेक पिढ्यांपासून जेजुरीतील स्थानिक तरुण हि ४२ किलो वजनाची तलवार एका हाताने वर उचलून पेलवून धरू लागले तसेच तलवारीच्या कसरती करू लागले याचे रुपांतर पुढच्या काळात स्पर्धेत झाले

खंडा (तलवार) तोलून धरण्याच्या स्पर्धेत अंकुश गोडसे याने १४ मी.४९ सेकंद खंडा तोलून प्रथम क्रमाक मिळवला, अमोल खोमणे (११ मी.01 से.) हेमंत माने (६मी.१७ से.) यांनी अनुक्रमे दूसरा व तीसरा क्रमांक पटकावले.सुहास खोमणे, मंगेश चव्हाण, कुणाल खोमणे,गिरीश घाडगे, यांनी इतर पारितोषिके पटकाविली.

कसरतीच्या स्पर्धेत नितीन कुदळे याने प्रथम तर अक्षय गोडसे याने दूसरा क्रमांक, शिवम कुदळे, याने तीसरा क्रमांक मिळवला. शिवाजी राणे, विशाल माने,सचिन कुदळे, सौरभ सकट,शुभम कारकुड यांनी या स्पर्धेतील इतर बक्षिसे पटकाविली.विजेत्यांना रोख रक्कम व गौरव चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेचे पंच म्हणून माजी विश्वस्त सुधीर गोडसे, श्री खंडोबा पालखी सोहळा समितीचे अध्यक्ष जालिंदर खोमणे,कृष्णा कुदळे,सोमनाथ उबाळे,माउली खोमणे यांनी केले.

यावेळी देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त विश्वास पानसे, विश्वस्त पोपट खोमणे, अड पांडुरंग थोरवे,अनिल सौंदडे ,मंगेश घोणे, अभिजीत देवकाते,यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धेचे नियोजन व्यवस्थापक आशिष बाठे,सतीश घाडगे बाळा खोमणे, गणेश डीखळे व अधिकारी कर्मचारी वर्गाने केले.

थोडक्यात पण महत्वाचे



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कर्वेनगरमध्ये शस्त्रपूजन आणि विजयादशमी उत्सव साजरा

कर्वेनगर, पुणे : दैनिक संध्या

मंगळवार दिनांक २० ऑक्टोबर २०२६ रोजी कर्वेनगर परिसरात सायंकाळी ५ ते ८ या वेळेत शस्त्रपूजन आणि विजयादशमी उत्सव अत्यंत उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगर कार्यवाह चेतन भिसे यांनी केले.त्यांनी कर्वेनगरमध्ये चालणाऱ्या विविध सामाजिक प्रकल्पाची माहिती दिली. या शस्त्रपूजन उत्सव कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून कर्वेनगर येथील जेम्स (टोळ) हॉस्पिटलच्या संचालिका व सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर सौ चारुलता बापये ह्या उपस्थित होत्या. या भव्य कार्यक्रमामध्ये ५०० स्वयंसेवक पूर्ण गणवेशात सहभागी झाले होते,तर सुमारे ३०० नागरिक देखील या सोहळ्याचे साक्षीदार बनले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात संघ कार्यातील कुटुंब प्रबोधन या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.प्रमुख वक्ते पुणे महानगर कुटुंब प्रबोधन संयोजक अभय ठकार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना उद्देश आणि संघाच्या शंभर वर्षांच्या प्रवासाचा इतिहास उपस्थितांसमोर मांडला. या कार्यक्रमाला कर्वेनगर संघचालक उदयन पाठक प्रामुख्याने उपस्थित होते.उपस्थित नागरिकांमध्ये महिलांची,महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. संचालनास कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या मैदानापासून निघून कॅनाल राष्ट्र,भालेकर वस्ती,इंगळे नगर, डॉ आंबेडकर चौक,हिंगणे होम चौक,कर्वेनगर पूल मार्गे गेट क्रमांक दोन कर्वे संस्थेच्या मैदानावर सांगता झाली. कर्वेनगरमधील स्थानिक नागरिकांनी या शिस्तबद्ध संचलनाचे आणि कार्यक्रमाचे ठिकठिकाणी उस्फुर्त सहर्ष स्वागत केले.

शिरूर तालुक्यात मारहाणीच्या दोन घटना

कवठे येमाई : दैनिक संध्या

शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत न्हावरे आणि चांडोह येथे मारहाणीच्या दोन स्वतंत्र घटना घडल्या आहेत. न्हावरे येथे गाडीला कट मारल्याच्या कारणावरून वाद होऊन एका तरुणाच्या पायावर घन मारून दुखापत केल्याचा, तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. दुसऱ्या घटनेत चांडोह येथे शेतातील जनावरांसाठीचे गवत तोडण्याच्या कारणावरून वाद होऊन दगड आणि कोयत्याने मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्हावरे ते गुनाट जाणाऱ्या रस्त्यावर आप्पासाहेब बेडकर यांच्या घराजवळ दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.१५ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. हिराबाई रामकृष्ण बीडगर (वय ५३, रा. न्हावरे, ता. शिरूर, जि. पुणे) या आपल्या मुलासह व इतर नातेवाईकांसोबत स्कॉर्पिओ गाडीतून प्रवास करीत होत्या.यावेळी पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधील व्यक्तींनी गाडीला कट मारल्याच्या कारणावरून त्यांच्याशी वाद घातल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या वादादरम्यान प्रशांत वाघमारे याने फिर्यादीच्या मुलाच्या पायावर घन मारून दुखापत केल्याचा आरोप आहे. तसेच फिर्यादीला ढकलून शिवीगाळ करण्यात आली आणि सर्वांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दुसरी घटना चांडोह, ता. शिरूर येथे दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता घडली. सुनील विठ्ठल भुजबळ (वय ३५, व्यवसाय शेती, रा. चांडोह) हे आपल्या भावासोबत शेतात गेले असता, प्रतीक सुरेश भुजबळ (वय ३२, रा. चांडोह) हा त्यांच्या शेतातील जनावरांसाठीचे गिनी गवत तोडत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत विचारणा केली असता आरोपीने फिर्यादीच्या भावाला शिवीगाळ करून त्याच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. भांडण सोडवण्यासाठी सुनील भुजबळ पुढे गेले असता आरोपीने दगड फेकून मारल्याने त्यांच्या पाठीला दुखापत झाली. त्यानंतर हातातील कोयत्याने डोक्यात मारून दुखापत केली आणि पुन्हा शेतात आल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.या प्रकरणी प्रतीक सुरेश भुजबळ याच्याविरुद्ध शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ९४१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ३५२, ३५१(२) व ३५१(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास सहायक फौजदार चव्हाण करीत आहेत.

भाव कोसळल्याने झेंडू फेकला रस्त्यावर

चाकण : दैनिक संध्या

दसरा सणाच्या पार्श्वभूमीवर खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील उपबाजारात फुलांची उच्चांकी आवक झाली. झेंडूचे भाव कोसळल्याने शेतकरी व व्यापाऱ्यांनी त्यामुळे झेंडूची फुले रस्त्यावर फेकून दिली. चाकण परिसरात दसरा म्हटले की, झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असते. सणाच्या पार्श्वभूमीवर चांगला बाजारभाव मिळेल, या अपेक्षेने खेड तालुक्यातील फूल उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने फुलांची लागवड केली होती. मात्र, यंदा झेंडूच्या फुलांची आवक वाढल्याने बाजारभावात मोठी घसरण झाली. दसऱ्याच्या आदल्या दिवशी ४० रुपये प्रतिकिलो दराने विकली जाणारी फुले सायंकाळ पर्यंत २० रुपयांवर आली.

आळंदीत विजयादशमीचा उत्साह; खंडोबा मंदिरात सीमोल्लंघन सोहळा

■ आळंदी (दै. संध्या)

संतभूमी आळंदीत विजयादशमी अर्थात दसरा सण भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दसऱ्यानिमित्त शहरातील धार्मिक परंपरेनुसार सायंकाळी सहा वाजता खंडोबा मंदिर येथे सीमोल्लंघन सोहळा पार पडला. यावेळी संत ज्ञानेश्वर माऊली, नरसिंह सरस्वती स्वामी, श्रीराम आणि काळभैरवनाथ यांच्या पालख्यांचे अखंड हरिनामाच्या गजरात आगमन झाले. टाळ-मृदंगाचा निनाद, भाविकांचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर खंडोबा मंदिर येथे आळंदी देवस्थानच्या वतीने विधिवत शमीपूजन करण्यात आले. दसऱ्याच्या दिवशी शमीपूजन आणि सीमोल्लंघनाला धार्मिक परंपरेत विशेष महत्त्व आहे. या परंपरेनुसार देवतांच्या पालख्यांचे आगमन झाल्यानंतर पूजनविधी पार पडला. उपस्थित मान्यवर आणि भाविकांनी या सोहळ्यात सहभागी होत धार्मिक परंपरेचे दर्शन घेतले. या सोहळ्याला आळंदी देवस्थानचे प्रमुख



विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त पुरुषोत्तम पाटील, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, माजी नगराध्यक्ष सुरेश वडगावकर, राहुल चिताळकर, नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे, सागर कुऱ्हाडे, गोविंद कुऱ्हाडे, माजी नगरसेवक प्रकाश कुऱ्हाडे, माजी सभापती श्रीधर कुऱ्हाडे, नंदकुमार कुऱ्हाडे, संजय घुंडरे, योगिराज कु-हाडे, अमित कुऱ्हाडे, महेश कुऱ्हाडे, सतीष कुऱ्हाडे, समीर कुऱ्हाडे, शामराव गिलबिले, नंदकुमार वडगावकर, अजित वडगावकर, आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भिमाजी नरके, मच्छिंद्र शेंडे, भिमाजी घुंडरे आणि सौरभ रानवडे आदी उपस्थित होते. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पवित्र वास्तव्याने आणि वारकरी संप्रदायाच्या परंपरेने समृद्ध असलेल्या आळंदी नगरीत दसरा सणाला विशेष महत्त्व आहे.

भंवर राठोड डिझाईन स्टुडिओ डिझाईन एक्झिबिशन 2026, पुणे - कलाकृती, 3D मॉडेल्स आणि सर्जनशील अभिव्यक्तींचा उत्सव

■ 2026 मधील भारतातील सर्वात मोठे डिझाईन प्रदर्शन

■ पुणे (दै. संध्या)

भंवर राठोड डिझाईन स्टुडिओ (BRDS) द्वारा आयोजित BRDS डिझाईन एक्झिबिशन 2026 चे आयोजन पुण्यातील मेसे ग्लोबल अरेना येथे करण्यात आले, ज्यामध्ये देशभरातील उदयोन्मुख डिझाईन विद्यार्थ्यांच्या विविध सर्जनशील कलाकृतींचे प्रदर्शन करण्यात आले. हे वार्षिक प्रदर्शन BRDS द्वारे 15 प्रमुख शहरांमध्ये आयोजित केले जाते, ज्यात पुणे, मुंबई, अहमदाबाद, बेंगळुरू, नाशिक, हैदराबाद, दिल्ली, जयपूर, छ. संभाजीनगर, लखनौ, कोलकाता, भोपाळ, नागपूर, अकोला आणि रायपूर यांचा समावेश आहे, ज्यामुळे हा भारतातील सर्वात व्यापक डिझाईन शिक्षण उपक्रमांपैकी एक बनला आहे. या प्रदर्शनाचा उद्देश फॅशन, इंटिरियर, प्रॉडक्ट, ऑटोमोबाईल, ग्राफिक डिझाईन, ॲनिमेशन, फोटोग्राफी आणि फाईन आर्ट्समधील करिअरच्या संधींबद्दल जागरूकता निर्माण करणे, तसेच विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता आणि व्यावहारिक कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा होता.

विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिभेचे प्रदर्शन कलाकृती, 3D मॉडेल्स, वेशभूषा, चित्रकला आणि इतर सर्जनशील प्रकल्पांद्वारे केले.

एक प्रमुख आकर्षण BRDS चे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. भंवर राठोड यांचे करिअर मार्गदर्शन सेमिनार होते, ज्यामध्ये त्यांनी NID, NIFT, NATA आणि UCEED सह प्रवेश परीक्षांच्या तयारीबाबत महत्त्वाची माहिती दिली. या कार्यक्रमात 25 हून अधिक आघाडीच्या डिझाईन कॉलेज आणि विद्यापीठांनीही सहभाग घेतला, ज्यामुळे विद्यार्थ्यांना क्रिएटिव्ह क्षेत्रातील उच्च शिक्षण आणि करिअरच्या संधी जाणून घेण्याची संधी मिळाली.



भंवर राठोड डिझाईन स्टुडिओ (BRDS) बद्दल

भंवर राठोड डिझाईन स्टुडिओ (BRDS), ज्याची स्थापना 2005 मध्ये झाली, ही एक आघाडीची डिझाईन शिक्षण संस्था आहे, जिची भारतभरात 91 केंद्रे आहेत, ज्यात पुणे शहरातील 8 केंद्रांचा समावेश आहे. गेल्या 21 वर्षांत, BRDS ने डिझाईन, आर्किटेक्चर आणि फाईन आर्ट्समधील इच्छुक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे आणि दरवर्षी 10,000 हून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

वाल्हे नगरीत पारंपरिक पद्धतीने दसरा साजरा

■ वाल्हे (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यात महर्षी वाल्मीक ऋषींची तपोभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाल्हे नगरीत पारंपरिक पद्धतीने सीमोल्लंघन करून पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी दसरा सण उत्साही वातावरणात साजरा केला. यावेळी प्रथेप्रमाणे प्रत्येक देवी देवतांच्या नयनमनोहारी पालख्या व आकाशाला गवसणी घालणाऱ्या ससाण काठ्या ह्या पारंपारिक वाद्याच्या गजरात श्री भैरवनाथ देवाच्या दर्शन भेटीला आल्यावरच सीमोल्लंघनासाठी रवाना झाल्या.या दरम्यान गुलालाची मुक्त उधळण व "नाथ साहेबांच चांगभल "असा जयघोष करून देवाचे सालकरी, मानकरी यांसह अठरा पगड समाजातील ग्रामस्थांनी संपूर्ण परिसर अक्षरशः दणाणून सोडला होता.

अशातच भवानी मातेच्या पालखी सह विविध देवतांच्या पालख्या सायंकाळी सहाच्या सुमारास येथील महर्षी वाल्मीकी विद्यालयाच्या प्रांगणात आल्यावर गावातील पाटील घराण्याकडून आपट्याच्या पानांचे पूजन करूनच सीमोल्लंघनास सुरवात करण्यात आली.



यावेळी आपट्याची पाने सोने म्हणून लुटताना ग्रामस्थांची मात्र गर्दी उसळली होती. या सोहळ्यासाठी प्रामुख्याने जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा.दिगंबर दुर्गाडे यांसह पाटील घराण्याचे गिरीश पवार विष्णू पवार सतीश पवार तसेच वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड उपसरपंच सागर भुजबळ सुकलवाडीचे सरपंच संदेश पवार वागदरवाडीचे सरपंच सुनील पवार महर्षी वाल्मीकी वारकरी सेवा संघाचे संस्थापक ह.भ.प.अशोक महाराज पवार विकास महाराज पवार भाजपचे सचिन लंबाते माजी सरपंच अमोल खवले शिवसेनेचे सागर भुजबळ माथाडी कामगार संघटनेचे नेते निलेश पवार सामाजिक कार्यकर्ते नाना दाते आदी मान्यवर उपस्थित होते.

या दरम्यान जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाल्हे पोलीस दुरक्षेत्राचे हवालदार भाऊसाहेब भोंगळे यांसह आदी सहकाऱ्यांनी सीमोल्लंघनाच्या ठिकाणी अनुचित प्रकार घडू नयेत तसेच पुणे पंढरपूर महामार्गावरही वाहतूकीची कोंडी होऊ नये यासाठी चोख बंदोबस्त ठेवला होता.

विचारांची उंची समजून घेणे तरुण पिढीसाठी आवश्यक – उल्हासदादा पवार



■ नारायणगाव (दै. संध्या)

आजच्या तरुण पिढीने केवळ शिक्षण न घेता थोर व्यक्तींचे विचार, त्यांचे कार्य आणि जीवनमूल्ये समजून घेणे आवश्यक आहे. विचारांची उंची समजून घेतल्यास तरुणांना योग्य दिशा मिळू शकते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व व्यासंगी माजी आमदार उल्हासदादा पवार यांनी केले. नारायणगाव येथील ग्रामोन्नती मंडळ संचलित गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यालयात गांधी सप्ताहानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान, माजी विद्यार्थी संघ आणि समविचारी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी माजी आमदार उल्हासदादा पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष अनिल मेहेर होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष सुजित खैरे, उपाध्यक्ष शशिकांत वाजगे, विश्वस्त प्रकाश पाटे आणि कार्यवाहक रवींद्र पारगावकर यांनी उल्हासदादा पवार यांचे स्वागत केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका भालेराव यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. राखी रत्नपारखी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर काझी यांनी सूत्रसंचालन केले. या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना विचारांचे महत्त्व आणि जीवनमूल्यांची जाणीव करून देण्यात आली. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आव्हानात्मक सेवेसोबत कर्मचाऱ्यांकडून कलागुणांचे जतन - श्री. राजेंद्र पवार

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राला नाट्यकलेची उज्ज्वल परंपरा आहे. वीज क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे काम २४ तास आव्हानात्मक व अविरत सेवा देणारे आहे. या दैनंदिन कामाच्या धकाधकीतही कर्मचाऱ्यांमधील सुप्त कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, यासाठी आयोजित करण्यात येणारी ही नाट्यस्पर्धा म्हणजे महावितरणचा एक मौल्यवान सांस्कृतिक ठेवा आहे, असे प्रतिपादन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी बुधवारी (दि.२१) केले. पुणे येथे लोकशाहीर



अण्णाभाऊ साठे नाट्यगृहामध्ये महावितरण अंतर्गत 'आंतर प्रादेशिक राज्यस्तरीय नाट्यस्पर्धा-२०२६' च्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जगदाळे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य अभियंते सर्वश्री इब्राहिम मुलाणी, दत्तात्रेय बनसोडे, स्वप्निल काटकर, धर्मराज पेठकर, मिलिंद दिग्रसकर, आयोजन समितीचे अध्यक्ष श्री. ज्ञानदेव पडळकर तसेच मुख्य समन्वयक श्री. संजय ढोके, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. ललित गायकवाड यांची उपस्थिती होती. संचालक श्री. पवार पुढे म्हणाले की, नाटकामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संवाद कौशल्य व वेळेचे नियोजन यासारखे गुण विकसित होतात आणि हीच सकारात्मक ऊर्जा त्यांच्या कार्यालयीन कामकाजातही दिसून येत आहे. तर अध्यक्षीय मनोगतामध्ये श्री. दिलीप जगदाळे म्हणाले की, महावितरणमधील नाट्यकृतींचे सादरीकरण व्यावसायिक नाटकांच्या तोडीचे आहे आणि महावितरणची ही रंगभूमी नाट्याविष्काराने प्रगल्भ होत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी मुख्य अभियंता श्री. ज्ञानदेव पडळकर यांनी केले.